७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शनिवार, दि. २३ मे २०२६

www.dainikesandhya.com
www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १४७ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये




## विजेच्या कडकडाटासह सोसाट्याचा वारा, शहरात वाहतूक कोंडी



**पुणे (दै. संध्या)**

पुणे शहर आणि परिसरामध्ये शुक्रवारी दुपारपासूनच पावसाला सुरुवात झाली आहे. शहरातील अनेक भागांमध्ये विजेच्या कडकडाटासह सोसाट्याचा वारा सुटला होता. पावसामुळे शहरातील रस्त्यांवर वाहतूककोंडी होण्याची शक्यता वर्तवण्यात येतेय.

हवामानशास्त्र विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, मध्य महाराष्ट्रातील अहिल्यानगर, पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता असून नाशिक जिल्ह्यात हलक्या पावसाचा अंदाज आहे.


पुणे शहरातील केशवनगर, मुंढवा, खराडी परिसरात दुपारी ३ वाजल्यानंतर पावसाला सुरुवात झाली. तसेच औंध, बाणेर, बालेवाडी, सांगवी, शिवाजीनगर या भागात ४ वाजता विजेच्या कडकडासह पावसाच्या हलक्या सरी बरसल्या. याशिवाय वडाचीवाडी, पिसोळी, हांडेवाडी, होकारवाडी या परिसरात जोरदार पावसाला सुरुवात झाली आहे.

मराठवाड्यातील बीड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज आहे. तर छत्रपती संभाजीनगर, जालना जिल्ह्यात हलक्या सरीचा इशारा देण्यात आला आहे. तसेच उर्वरित मराठवाड्यात कोरड्या हवामानाची शक्यता हवामानशास्त्र विभागाने व्यक्त केली आहे.

महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये पुढच्या २४ तासांत वातावरणात अचानक बदल होणार आहे. राज्याच्या पश्चिम व दक्षिण भागात मेघगर्जनेसह पावसाची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. विशेषतः दक्षिण कोकण-गोवा पट्टा, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर तसेच मराठवाड्यातील काही भागांत पुढील दोन ते तीन तासांत मध्यम स्वरूपाच्या वादळी पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. हवामान तज्ज्ञांच्या माहितीनुसार, महाराष्ट्रावर सध्या विजांच्या कडकडाटासह ढगांची तीव्र वाढ होत असून काही ठिकाणी गारपीट आणि जोरदार वादळी वाऱ्यांसह पाऊस पडू शकतो. विशेषतः पुणे, सातारा, रायगड, रत्नागिरी या जिल्ह्यांमध्ये वातावरण ढगाळ झाले असून विजांच्या कडकडाटासह पावसाच्या सरी सुरू होण्याची शक्यता आहे. दक्षिण कोकण-गोवा किनारपट्टी तसेच पश्चिम महाराष्ट्रातील भागांत उष्णतेमुळे निर्माण झालेल्या स्थानिक हवामान बदलाचा परिणाम दिसून येत आहे. त्यामुळे अचानक ढग दाटून येणे, विजांचा कडकडाट आणि अल्पावधीत मुसळधार पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे. दरम्यान, मराठवाड्यातील काही भागांतही वातावरण अस्थिर झाले असून अधूनमधून विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. केंद्रीय कर्नाटकातील काही भागांवरही या हवामान प्रणालीचा परिणाम जाणवू शकतो, असे निरीक्षण हवामान अभ्यासकांनी नोंदवले आहे.

## 'नीट' पेपरफुटी प्रकरणात पुण्यातील मुख्याध्यापिका मनीषा हवालदार निलंबित

**पुणे (दै. संध्या)**




देश पातळीवर सध्या गाजत असलेल्या वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेशाच्या 'नीट' पेपर फुटी प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) पुण्यातून मनीषा हवालदार या शिक्षिकेला अटक केली आहे. फडके हौद परिसरातील सेठ हरिलाल सराफ प्रशालेच्या मुख्याध्यापिका असणाऱ्या हवालदार यांच्यावर तातडीने निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. मनीषा हवालदार यांचे एम.एस्सी बी.एड असे शिक्षण झाले आहे. त्या सुरवातीला शिवाजीनगर येथील मॉडर्न कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षिका म्हणून कार्यरत होत्या. त्यानंतर १९९२ च्या सुमारास विद्या प्रसारिणी सभेच्या भारत इंग्लिश स्कूल कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षिका म्हणून रूजू झाल्या. याच महाविद्यालयात १९९२ ते २०२४ पर्यंत त्या शिक्षिका म्हणून भौतिकशास्त्र विषय शिकवत होत्या. त्यानंतर सेवाज्येष्ठतेनुसार त्यांना फडके हौद परिसरातील सेठ हरिलाल सराफ प्रशालेत मुख्याध्यापिका म्हणून पदोन्नती देण्यात आली. त्या ३० जून २०२६ रोजी सेवानिवृत्त होणार होत्या. दरम्यान, 'सीबीआय'ने अटक केल्याचे समजताच सभेच्या नियामक मंडळाची तातडीने बैठक बोलविण्यात आली. बैठकीत हवालदार यांनी केलेल्या गैरकृत्याचा निषेध नोंदविण्यात आला. स्वातंत्र्यपूर्ण काळापासून कार्यरत असणाऱ्या संस्थेत गोर-गरिब विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते. गेल्या शंभर वर्षांच्या इतिहासात अशाप्रकारे कृत्य कोणत्याही शिक्षकांकडून झालेले नाही. हवालदार यांच्या कृत्याचा निषेध करण्यात येत आहे. 'सीबीआय'ने अटक केल्याचे समजल्यानंतर तातडीने हवालदार यांचे निलंबन केले आहे. त्याची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन केली आहे, अशी माहिती प्रशालेचे सचिव डॉ. सतीश गवळी यांनी दिली.

## रिक्त पदांची भरती व नवीन योजना गतीने राबवा – मंत्री पंकजा मुंडे

**मुंबई (दै. संध्या)**



पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे तातडीने भरून प्रशासकीय कामाला गती देण्याचे व ग्रामीण भागातील पशुवैद्यकीय पायाभूत सुविधा आधुनिक करण्याचे निर्देश पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले.

ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा असलेल्या पशुसंवर्धन क्षेत्राला अधिक सक्षम करण्यासाठी व पशुपालकांच्या आर्थिक उन्नतीसाठी पशुसंवर्धन विभागाची सविस्तर आढावा बैठक मंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात पार पडली. यावेळी पशुसंवर्धन सचिव रामास्वामी एन., पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत पशुसंवर्धनाला 'कृषी दर्जा' मिळाल्यानंतरच्या पुढील कार्यवाहीसह, नवीन योजनांची अंमलबजावणी व विभागातील रिक्त पदांच्या भरतीबाबत अत्यंत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असून, संबंधित अधिकाऱ्यांना गतिमान कामाचे निर्देश देण्यात आले आहेत. पशुसंवर्धन क्षेत्राला नुकताच 'कृषी क्षेत्राचा दर्जा' बहाल करण्यात आला आहे. या ऐतिहासिक निर्णयानंतर पशुपालकांना व शेतकऱ्यांना कृषी क्षेत्राप्रमाणेच विविध सवलती, कर्ज आणि योजनांचा लाभ मिळणे सुलभ झाले आहे. या निर्णयाची तळागाळातील पशुपालकांपर्यंत प्रभावी अंमलबजावणी कशी करता येईल, तसेच तांत्रिक व प्रशासकीय अडचणी कशा दूर करता येतील, याचा सखोल आढावा घेऊन तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले. यामुळे ग्रामीण भागात दुग्धव्यवसाय आणि कुक्कुटपालनाला मोठी चालना मिळणार असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

## महाराष्ट्र येत्या काळात डेटा सेंटर हब बनण्याच्या तयारीत

**मुंबई (दै. संध्या)**



### मुख्यमंत्री फडणवीस : १० अधिकाऱ्यांकडे प्रत्येकी १० प्रकल्पांची जबाबदारी

स्वित्झर्लंडच्या दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत झालेल्या कराराच्या अनुषंगाने राज्यातील औद्योगिक, पायाभूत सुविधा, शैक्षणिक, डेटा सेंटर, स्मार्ट सिटी आणि शाश्वत विकासाशी संबंधित प्रकल्पांना गती देण्यासाठी जमीन वाटप, परवानग्या आणि प्रशासकीय प्रक्रिया निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्यात यावी. राज्यातील सामंजस्य कराराच्या अनुषंगाने प्रकल्पांच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्यासाठी एमआयडीसी, उद्योग संचालनालय आणि मंत्रालयातील १० प्रमुख अधिकाऱ्यांना प्रत्येकी १० प्रकल्प वेळेत पूर्ण होईल, याची जबाबदारी देण्यात येणार आहे. येत्या काळात महाराष्ट्र डेटा सेंटर हब बनण्याच्या तयारीत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दावोस येथे जागतिक आर्थिक परिषदेत झालेल्या सामंजस्य करारांच्या अंमलबजावणीचा आणि त्यानंतर राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सहायभूत सेवा धोरण व एकात्मिक हरित डेटा सेंटर पार्क धोरण-२०२४ अंतर्गत स्थापित झालेल्या/होणाऱ्या डेटा सेंटर्स/एकात्मिक डेटा हरित सेटर पार्कच्या सद्यःस्थितीविषयी आढावा घेतला. यावेळी राज्यमंत्री माधुरी मिसाळ, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ.पी. अन्बळगण, महानगर आयुक्त डॉ.संजय मुखर्जी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सीईओ पी. वेलारासु, शहर व औद्योगिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

प्रकल्प वेळेत पूर्ण होण्याच्या दृष्टीने प्रशासनाने कंपन्यांच्या पाठपुराव्याची वाट न पाहता स्वतः पुढाकार घेऊन जमीन वाटप, पर्यावरण मंजुरी, बांधकाम आराखडे आणि विविध परवानग्या पुढील तीन महिन्यांत पूर्ण कराव्यात, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्य डेटा सेंटर क्षेत्रातही वेगाने पुढे जात असून महाराष्ट्र देशातील सर्वात मोठ्या डेटा सेंटर गुंतवणूक केंद्रांपैकी एक बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. सध्या राज्यातील डेटा सेंटर प्रकल्प 'इन्व्हेस्टमेंट इन प्रोग्रेस' टप्प्यात असून त्यातून मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक अपेक्षित आहे. याचबरोबर या डाटा सेंटर साठी लागणारी ऊर्जा आणि पाणी महाराष्ट्रात मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. त्यामुळे हे प्रकल्प वेळेत आणि कालमर्यादेत पूर्ण होण्यासाठी प्रक्रिया सुलभीकरणावर अधिक भर द्यावा तसेच जागा उपलब्धता आणि वितरणाचे प्रमाण वाढवावे, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

नवी मुंबई हे राज्यातील प्रमुख डेटा सेंटर हब म्हणून उदयास येत असून महापे आणि परिसरात मोठे प्रकल्प सुरू होत आहेत. तसेच खालापूरला तिसरे महत्त्वाचे डेटा सेंटर क्लस्टर म्हणून विकसित करण्याचे नियोजन सुरू आहे. पनवेल परिसरात पायाभूत सुविधा मजबूत करण्यावर भर देण्यात येत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

उत्पादन क्षेत्रातील इलेक्ट्रॉनिक्स, चिप्स, एरोस्पेस, वस्त्रोद्योग, वाहन उद्योग आणि संरक्षण क्षेत्रातील प्रकल्पांचा मोठा वाटा असून सेवा क्षेत्रात डेटा सेंटर, आयटी-आयटीईएस, फिनटेक आणि ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर (जीसीसी) प्रकल्पांना प्राधान्य देण्याचे निर्देश देण्यात आले.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

### ढिंग-टांग




## गडचिरोली ते मुंबई उद्योग, पायाभूत सुविधा आणि पर्यावरणपूरक विकासाला गती : उपमुख्यमंत्री

# महाराष्ट्राची १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे वाटचाल

**मुंबई (दै. संध्या)**




"विकसित भारत २०४७" च्या दिशेने वाटचाल करताना महाराष्ट्र वेगाने पुढे जात असून, मुंबईपासून गडचिरोलीतील सुरजागडपर्यंत विकासाचा नवा एक्सप्रेसवे उभारण्यात येणार आहे. उद्योग, आधुनिक पायाभूत सुविधा, वेगवान दळणवळण, कौशल्य विकास, गृहनिर्माण आणि पर्यावरणपूरक प्रकल्पांच्या माध्यमातून राज्याचा सर्वांगीण विकास साधला जात आहे. या व्यापक विकास आराखड्यामुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचणार असल्याचा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

दि हिंदू कॉन्क्लेव्ह' मध्ये "मुंबई ते सुरजागड – समृद्धीचा महामार्ग" या विषयावर बोलताना त्यांनी राज्यातील पायाभूत सुविधा, उद्योग, गृहनिर्माण, परिवहन, पर्यावरण आणि गडचिरोलीसारख्या दुर्गम भागांतील विकासाचा विस्तृत आढावा मांडला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मुंबई हे देशाचे आर्थिक केंद्र आणि गडचिरोलीसारखे दुर्गम भाग हे नैसर्गिक व औद्योगिक संपत्तीने समृद्ध असल्याचे सांगत त्यांनी राज्यातील विकास केवळ महानगरांपुरता मर्यादित न ठेवता तो ग्रामीण, आदिवासी आणि मागास भागांपर्यंत पोहोचवण्यावर शासनाचा भर असल्याचे स्पष्ट केले. समृद्धी महामार्ग, मेट्रो जाळे, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, औद्योगिक कॉरिडॉर, स्टील प्रकल्प आणि कौशल्य विकास केंद्रांमुळे राज्यात रोजगारनिर्मितीला मोठी चालना मिळाली असून कोस्ट टू फॉरेस्ट असा विकासाचा प्रवास गेल्या काही वर्षांत घडवून आणला आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, गडचिरोलीचा पालकमंत्री असताना नक्षलग्रस्त भागांमध्ये जाऊन स्थानिक नागरिक, आदिवासी समाज आणि पोलिसांशी संवाद साधत विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला. रक्षाबंधन आणि दिवाळीसारखे सणही जवानांसोबत गडचिरोलीत साजरे केल्याचे सांगत त्यांनी, "दुर्गम भागाचा विकास करायचा असेल, तर तेथील समाजाशी भावनिक नाते जोडणे आवश्यक असते असे सांगितले.

गडचिरोलीत रस्ते, पूल, रुग्णवाहिका, ऑक्सिजन प्लांट आणि प्रशासनासाठी आवश्यक सुविधा उभारण्यात आल्या आहेत. मात्र, केवळ सुविधा नव्हे तर उद्योग आणि रोजगार निर्माण करणे ही सरकारची प्रमुख भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले.

टाटा समूहासोबत चर्चा करून स्थानिक युवकांसाठी कौशल्य विकासाची संकल्पना पुढे आणण्यात आली. त्यातून १७० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून 'टाटा टेक्नॉलॉजी कौशल्य विकास केंद्र' सुरू करण्यात आले. गडचिरोलीत अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त हे केंद्र दरवर्षी सुमारे ४,८०० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देत असून भविष्यात मोठ्या प्रमाणावर रोजगार आणि उद्योजक निर्माण होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वामुळे नक्षलवाद मोठ्या प्रमाणात नियंत्रणात आला असून गडचिरोलीसारख्या नक्षलग्रस्त भागात विकासाची नवी दिशा निर्माण झाली आहे.

आज जिल्ह्यात उद्योग, रस्ते, इंटरनेट सुविधा, आरोग्य सेवा आणि शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू असून दुर्गम भाग मुख्य प्रवाहाशी जोडले जात आहेत.

कोनसरी येथे लॉयड मेटल्स लिमिटेडसोबत २० हजार कोटी रुपयांच्या 'इंटिग्रेटेड स्टील प्लांट'साठी सामंजस्य करार करण्यात आला असून, त्यातून सुमारे १० हजार रोजगार निर्माण होणार आहेत. याशिवाय सुरजागड इस्पातच्या माध्यमातून आणखी २० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होत असून सुमारे ८ हजार तरुणांना रोजगार मिळणार आहे.

## महाराष्ट्राला जागतिक जहाजबांधणी केंद्र बनविण्याची संधी

### मंत्री नितेश राणे : ४,१५० कोटींच्या अत्याधुनिक मेरीटाईम कॉम्प्लेक्सची उभारणी

**मुंबई (दै. संध्या)**




महाराष्ट्राला देशातील अग्रगण्य जहाजबांधणी व सागरी औद्योगिक केंद्र बनविण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले जात असून, पालघर जिल्ह्यातील नांदगाव येथे सुमारे ४,१५० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून अत्याधुनिक 'युनायटेड साधव इंटिग्रेटेड मेरीटाईम कॉम्प्लेक्स' उभारण्याचा प्रस्ताव समोर आला आहे. या प्रकल्पामुळे महाराष्ट्राच्या सागरी अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळणार असून राज्याला जागतिक मेरीटाईम हब बनविण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा ठरेल, असे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी सांगितले.

पालघर जिल्ह्यातील नांदगांव (वाढवण परिसर) आणि दिघी येथे शिपयार्ड विकसित करण्याबाबत आयोजित बैठकीत मंत्री नितेश राणे बोलत होते. यावेळी महाराष्ट्र सागरी महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी, युनायटेड साधव इंटिग्रेटेड मेरीटाईम प्रायव्हेट लिमिटेडचे वेदांत चौधरी, अंबर आयडे (दूरदृश्य प्रणालीद्वारे) आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डासमोर सादर करण्यात आलेल्या या प्रकल्पानुसार, वाढवण या आगामी खोल पाण्याच्या बंदराजवळ ६०० एकर क्षेत्रात जागतिक दर्जाचे एकात्मिक जहाजबांधणी, दुरुस्ती, ड्राय डॉक, ऑफशोअर सेवा आणि ग्रीन शिप रिसायकलिंग केंद्र उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ५०० दशलक्ष अमेरिकी डॉलरची गुंतवणूक प्रस्तावित असून, पहिल्या टप्प्यात दोन वर्षांत काम सुरू होणार आहे.

प्रकल्पासाठी राज्य सरकारकडे ३० वर्षांच्या नूतनीकरणीय भाडेपट्ट्यावर जमीन उपलब्ध करून देणे, मेगा प्रकल्प दर्जा, सिंगल विंडो मंजुरी, भांडवली अनुदान, कौशल्य विकास सहाय्य आणि विविध नियामक प्रक्रियांमध्ये समन्वय साधण्याची मागणी करण्यात आली आहे. यासाठी महाराष्ट्र सागरी महामंडळाचे अधिकारी आणि कंपनीचे अधिकारी प्रत्यक्ष नांदगाव परिसराची पाहणी करुन अहवाल सादर करावेत असे निर्देश मंत्री नितेश राणे यांनी यावेळी दिले. मंत्री नितेश राणे यांनी सांगितले की, सागरी क्षेत्रातील गुंतवणूक, रोजगार निर्मिती, हरित तंत्रज्ञान आणि स्थानिक विकास यांचा समतोल साधणाऱ्या प्रकल्पांना राज्य सरकार प्राधान्य देणार आहे. महाराष्ट्राला 'ब्लू इकॉनॉमी' मध्ये देशातील अग्रणी राज्य बनविण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## संपादकीय

# धोका वाढताच ‘एआय’चा गळा घोटणारे नवे शस्त्र- ‘किल स्विच’

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे फक्त स्मार्ट चॅटबॉट किंवा ऑटोमेशन नाही. ती आता निर्णय घेणारी, माहिती निर्माण करणारी, निरीक्षण करणारी आणि मानवी वर्तनावर प्रभाव टाकणारी शक्ती बनत आहे. संगणक आणि यंत्रांना माणसासारखे विचार करणे, शिकणे आणि निर्णय घेणे शिकविणारी ही तंत्रज्ञान पद्धती वेगाने वाढत आहे. शिक्षण, आरोग्य, बँकिंग, उद्योग, न्यायव्यवस्था अशा अनेक क्षेत्रांत तिचा वापर होतोय. आज जगासमोर सर्वांत महत्त्वाचा प्रश्न असा उभा आहे की, “एआय कोणाच्या नियंत्रणाखाली असणार आणि ते मानवजातीच्या हितासाठी काम करणार का?” - कारण तंत्रज्ञान जितके सामर्थ्यवान बनते, तितकी त्याच्या चुकीच्या वापराची भीतीही वाढते. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने बनावट चित्रे, खोटे व्हिडीओ, दिशाभूल करणारी माहिती आणि मानवी निर्णयांवर प्रभाव टाकणाऱ्या प्रणाली निर्माण होत आहेत. त्यामुळे सुरक्षित आणि नैतिक ‘एआय’ची गरज आता पूर्वीपेक्षा अधिक तीव्र झाली आहे. याच पार्श्वभूमीवर ‘किल स्विच गव्हर्नन्स मॉडेल’ ही नवी संकल्पना महत्त्वाची ठरत आहे. या मॉडेलनुसार एखादी एआय प्रणाली मानवजातीसाठी धोकादायक ठरत असल्यास तिचे संगणकीय सामर्थ्य त्वरित बंद केले जाऊ शकते. म्हणजेच, एआय सर्व्हर, क्लाउड नेटवर्क, डेटा सेंटर्स किंवा जीपीयू निष्क्रिय करून ती प्रणाली थांबवता येईल. साध्या भाषेत सांगायचे तर, ‘एआय’ला आवश्यक असलेली ऊर्जा आणि संगणकीय शक्ती बंद केली तर त्याचे कार्यही थांबेल. पूर्वी एआयचे नियंत्रण मुख्यतः कोड लिहिणाऱ्या किंवा मॉडेल विकसित करणाऱ्या कंपन्यांकडे होते. आता मात्र ‘कॉम्प्युटर कंट्रोल’ म्हणजे संगणकीय शक्ती पुरवणाऱ्या संस्थांकडे अंतिम नियंत्रण जाऊ शकते. आधुनिक एआय प्रणालींना प्रचंड संगणकीय क्षमता लागते. हजारो जीपीयू, अत्याधुनिक डेटा सेंटर्स. सतत चालणारे क्लाउड नेटवर्क याशिवाय प्रगत एआय कार्य करू शकत नाही. ही सुविधा असणाऱ्यांकडे एआय थांबवण्याची ताकद असते. या मॉडेलचा सर्वांत मोठा फायदा म्हणजे सुरक्षा. जर एआय चुकीची माहिती पसरवत असेल, सायबर हल्ल्यांना मदत करत असेल किंवा मानवी नियंत्रणाबाहेर जात असेल, तर एआयला त्वरित थांबवणे शक्य होईल. भविष्यात जैविक शस्त्रनिर्मिती, आर्थिक फसवणूक किंवा डिजिटल युद्धांमध्ये एआयचा गैरवापर होण्याची भीती व्यक्त केली जाते. अशा वेळी ‘किल स्विच’ ही यंत्रणा आपत्कालीन सुरक्षाकवच ठरू शकते. ‘किल स्विच’ मॉडेलमुळे बाह्य नियंत्रणाची एक नवी व्यवस्था निर्माण होते. तथापि, या मॉडेलवर गंभीर प्रश्नही उपस्थित केले जात आहेत. सर्वांत मोठा प्रश्न म्हणजे अंतिम निर्णय कोण घेणार? एखादी एआय प्रणाली धोकादायक आहे की नाही हे ठरवण्याचा अधिकार एका खासगी कंपनीकडे असावा का? जर काही मोजक्या कंपन्यांकडे इंटरनेट, क्लाउड आणि संगणकीय शक्तीचे नियंत्रण असेल तर डिजिटल सत्तेचे केंद्रीकरण वाढू शकते. भविष्यात काही तंत्रज्ञान कंपन्या सरकारांपेक्षाही अधिक प्रभावशाली बनण्याची शक्यता नाकारता येत नाही. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पारदर्शकता. ‘हानी’ किंवा ‘धोका’ याची व्याख्या नेमकी काय असणार? चुकीची माहिती, राजकीय मतभेद, आर्थिक संकट किंवा सुरक्षा धोका - यातील सीमारेषा अनेकदा अस्पष्ट असतात. स्पष्ट निकष नसतील तर ‘किल स्विच’चा गैरवापर होण्याची भीती निर्माण होते. काही वेळा विरोधी विचार दडपण्यासाठी किंवा स्पर्धकांना रोखण्यासाठीही अशा यंत्रणांचा वापर होऊ शकतो. यामुळे ‘डिजिटल सार्वभौमत्व’ हा नवा प्रश्न समोर येतो. एआय प्रणाली जागतिक स्वरूपाच्या असल्या तरी त्यांचे नियंत्रण काही देशांतील कंपन्यांकडे केंद्रित होत आहे. भविष्यात संगणकीय शक्ती तेल, वीज किंवा अणुऊर्जेसारखी सामरिक संपत्ती मानली जाऊ शकते.

## संस्कृत सुभाषित

कस्य दोष: कुले नास्ति, व्याधिना कोन पीडित:।
केन न व्यसनं प्राप्तं, श्रिय: कस्य निरन्तरा ।।

अर्थ – दोष कोणत्या कुळात नसतो? व्याधीमुळे कोणाला त्रास होत नाही? संकटे कोणावर येत नाहीत? आणि कोणाची संपत्ती टिकून राहते? सर्वांनाच या सर्वांशी तोंड द्यावे लागते.

## गुरु वचन

### सर्वोत्कृष्ट शाकाहार : लजपत राय सभरवाल

आपण सर्व जीवांना ईश्वराचा अंश मानतो म्हणून आपल्या धर्मग्रंथांमध्ये मांसाहार वर्ज्य करण्यास सांगितले आहे. महाभारतात भिष्म पितामह यांनी मांस खाणारा, मांस विकणारा व मांसासाठी जीवाची हत्या करणाऱ्यांना दोषी ठरवले आहे. म्हणून सर्व धर्मग्रंथांमध्ये शाकाहारच सर्वोत्कृष्ट आहार असल्याचे सांगितले आहे.

संत, महापुरुष यांनी सुद्धा सांगितले आहे की, शाकाहारामुळे आपले विचार सकारात्मक होतात तसेच दया व साहस गुण विकसित होतात.

विचारांवर प्रभाव शाकाहारामुळे आपले विचार प्रभावित होतात. जर आपणास मन, वचन व कर्माने पवित्र व्हायचे असेल तर आपण शाकाहार म्हणजे फळ–भाज्यांचा पूर्ण आहारच घ्यायला हवा. खरंतर, बहुतांश मानवी मनाच्या एका कोपऱ्यात पशु व्यवहार दडलेला असतो. जर आपणास त्या पशुत्वातून मुक्त व्हायचे असेल तर मांसाहार सोडायलाच पाहिजे.

आपण फक्त जीभेचे चोचले पुरवण्यासाठी दुसऱ्या जीवांची हानी करणे टाळून त्यांच्या संरक्षणासाठी सतत प्रयत्नशील राहायला हवे म्हणून पौष्टिक व ज्या आहारामुळे कुठल्याही जीवाची हानी होणार नाही असा आहार घ्यायला हवा. आहार साधन असून, साध्य नाही. शाकाहार कुठल्याही व्यक्तीच्या जगण्याची शैली निर्धारित करतो. असा आहार मन व शरीराला मजबूत करतो. शाकाहारामुळे फक्त आपले विचारच शुद्ध न होता आपल्यात दया, क्षमा सारख्या भावनांचा विकास होतो. आपण जगण्यासाठी जेवण करतो, जेवणासाठी जगत नाही याचा विसर पडायला नको. म्हणूनच आहार एक साधन असून साध्य नाही.

## उपदेशकथा

पालनपूर हे गुजरातेतील ऐतिहासिक शहर. मुंबईचा जव्हेरी बाजार पालनपूरच्या जैन जवाहिऱ्यांनी गजबजलेला आहे. तेथे १९२४ मधील घडलेली ही घटना. एक इंग्रज अंमलदार नि त्यांची मड्डुम यांनी एक सोन्याचा चंद्रहार पाच हजारांना विकत घेतला. पेढीचे मालक सूरजमलभाई थोड्या वेळाने दुकानात आले. त्यांना या व्यवहाराची हकीकत कळताच अरिष्ट कोसळल्यासारखा त्यांचा चेहरा गोरामोरा झाला; कारण त्या हाराची किंमत तीन हजार होती. त्यानीं युरोपियनांच्या हॉटेलातून चौकशीसाठी माणसे पाठवली, त्या जोडप्याचा छडा लावला नि दोन हजार रुपये परत केले. सूरजमलशेठजींच्या दानतीची ही कथा दंतकथेत परिणत झाली. लोक त्यांना ‘देवमाणूस’ म्हणूनच ओळखत. उत्तरायुष्यात त्यांनी अध्यात्मसाधनाही केली. सूरजमलशेठजींच्या सचोटीच्या कथा पालनपूरच्या नबाबाच्या कानावर गेल्या तेव्हा ‘ये तो अल्ला है भई, अल्ला !’ असे उद्गार निघाले. आजही जव्हेरी घराण्यात ‘अल्ला’ हे आडनाव लावतात. पालनपूरच्या महाजन हॉस्पिटलच्या प्रवेशद्वारापाशी या सत्यनिष्ठ व्यापाराचा पुतळा आहे. त्यावरही ‘सूरजमल जव्हेरी अल्ला’ असाच नामोल्लेख आहे !

कथा उपदेश : सचोटीने, प्रामाणिकपणाने व्यवहार केल्यास तोटा न होता आपले नाव या जगात राहते.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:मघा २६:०८:५९+ |
| २३ मे २०२६ | योग:ध्रुव ०६:१३:०६ |
| शनिवार | योग:व्याघात २८:४२:१८+ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:विष्टि १६:४०:४२ |
| अधिक ज्येष्ठ शीर्ष | करण:बव २८:२७:२२+ |
| शके संवत्– १९४८ | सूर्य:वृषभ |
| संवत्सर – पराभवनाम | चन्द्र:सिंह०२:०७:५० |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४६ |
| मास– अधिक ज्येष्ठ | मुस्लिम मास – जिल्हेज |
| ऋतु– सौर ग्रीष्म | तारीख – ६ |
| शुक्ल पक्ष | विशेष |
| तिथि:अष्टमी २८:२७:२२+ | दुर्गाष्तमी |

## दै. ‘संध्या’ धमाल सूडोकु क्र. ९५७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 8 | | 3 | | | | 4 | |
| 7 | 3 | | 2 | 5 | | | | |
| | | | | | 7 | 3 | | |
| | | | | 3 | 6 | 4 | 9 | 7 |
| | 9 | 3 | | 7 | | 6 | 5 | |
| 4 | 6 | 7 | 9 | 1 | | | | |
| | | 9 | 1 | | | | | |
| | | | | 4 | 9 | | 3 | 2 |
| | 5 | | | | 3 | | 6 | 9 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९५६ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 2 | 8 | 7 | 4 | 9 | 6 | 3 | 1 |
| 9 | 1 | 3 | 8 | 6 | 5 | 2 | 4 | 7 |
| 6 | 4 | 7 | 3 | 1 | 2 | 8 | 5 | 9 |
| 3 | 6 | 9 | 2 | 8 | 7 | 4 | 1 | 5 |
| 2 | 8 | 4 | 5 | 9 | 1 | 7 | 6 | 3 |
| 1 | 7 | 5 | 4 | 3 | 6 | 9 | 8 | 2 |
| 7 | 5 | 1 | 6 | 2 | 4 | 3 | 9 | 8 |
| 8 | 9 | 6 | 1 | 7 | 3 | 5 | 2 | 4 |
| 4 | 3 | 2 | 9 | 5 | 8 | 1 | 7 | 6 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १४३० – जोन ऑफ आर्कला बरगंडीच्या सैन्याने पकडले.
- १४९८ – गिरोलामो साव्होनारोलाला मृत्युदंड.
- १५५५ – पॉल चौथा पोपपदी.
- १५६८ – नेदरलँडला स्पेनपासून स्वातंत्र्य.
- १६०९ – व्हर्जिनीयाचे दुसरे संविधान स्वीकृत.
- १७०१ – समुद्री चाचा कॅप्टन विल्यम किडला फाशी.
- १७८८ – दक्षिण कॅरोलिनाने अमेरिकेचे संविधान स्वीकारले.

### राष्ट्रीय

- २००१ – एव्हरेस्ट शिखर प्रथमच भारतीय लष्कराच्या पथकाकडून सर.
- २००६ – हरियाणामध्ये फरीदाबादच्या सूरजकुंड भागात एका शाळेच्या जवळ ५० क्षेपणास्त्रे सापडली.

### जन्म

- १०५२ – फिलिप पहिला, फ्रांसचा राजाचा जन्म.
- ११०० – किन्झाँग, चीनी सम्राटचा जन्म.
- १८४४ – अब्दुल बहा, बहाई धर्मगुरुचा जन्म.
- १८६५ – एपितासियो पेसोआ, ब्राझिलचा राष्ट्राध्यक्षाचा जन्म.
- १८९६ – केशवराव भोळे, मराठी संगीत समीक्षक, संगीत रचनाकार, संगीत दिग्दर्शक, लेखकाचा जन्म.
- १९१८ – डेनिस कॉम्प्टन, इंग्लिश क्रिकेट खेळाडूचा जन्म.

### निधन

- ११२५ – हेन्री पाचवा, पवित्र रोमन सम्राटचे निधन.
- १४९८ – गिरोलामो साव्होनारोला, ख्रिश्चन धर्मप्रसारक व फ्लोरेन्सचा राजाचे निधन.
- १५२३ – अशिकागा योशिताने, जपानी शोगनचे निधन.

## : SMS :

Jalebi Ko Female Dish Kyun Kaha Jata Hai?
.
.
.
.
Kyun K Ye Kabhi Seedhi Nahi Ho Sakti....

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ४०.२ | २८.५ |
| अहमदनगर | ३९.१ | २७.४ |
| अकोला | ४५.६ | ३०.८ |
| अमरावती | ४२.९ | ३१.९ |
| बीड | ४६ | ३२.७ |
| भंडारा | ४४.६ | ३१.७ |
| बुलढाणा | ४४.१ | २९.१ |
| चंद्रपूर | ४५.५ | ३४ |
| चेन्नई | ४९.४ | ३३.४ |
| नवी दिल्ली | ४२.९ | ३१.७ |
| धुळे | ४१.४ | २८.६ |
| गोंदिया | ४३ | ३१.५ |
| जळगाव | ४५.४ | ३०.१ |
| कोल्हापूर | ३७ | २४.२ |
| लातूर | ४०.६ | २८.७ |
| मुंबई | ४०.३ | ३३.९ |
| नागपूर | ४४.८ | ३२.१ |
| नांदेड | ४३.९ | ३१.३ |
| नंदूरबार | ३९.८ | ३० |
| नाशिक | ३९.२ | २४.७ |
| पुणे | ३६.६ | २५ |
| पंढरपूर | ४३ | २८.९ |
| सातारा | ३८.४ | २२.१ |
| सांगली | ४०.३ | २५ |
| सोलापूर | ४३.४ | २९.१ |
| वर्धा | ४४.९ | ३२.५ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम कौटुंबिक सुख व पत्नीच्या सहयोगाने मन प्रसन्न राहील.

**तूळ :** शुभ रंग :काळा, शुभ दिशा :दक्षिण जीवनसाथीच्या प्रगतीमुळे सामाजिक मान सन्मान वाढणार आहे.

**वृषभ :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा: पूर्व व्यवहार कुशलतेमुळे अधिकारी खुष राहतील. वहान सुख मिळेल. आळस दूर करा. आर्थिक उत्पन्न वाढणार आहे.

**वृश्चिक :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: पूर्व अचानक धन मिळण्याची शक्यता आहे. व्यवसायीक वाद आपल्या प्रयत्नामुळे संपुष्टात येईल.

**मिथून :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: दक्षिण मित्र किंवा सहकारी यांच्यावर जास्त विश्वास करू नका. मान प्रतीष्टा कमी होईल.

**धनू :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा: पूर्व व्यापारातील हेतु साध्य होण्याकरिता अधिक प्रयत्न करावे लागतील. आकर्षक प्रस्ताव आपल्याला येतील.

**कर्क :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पश्चिम व्यवसायिक समस्या दूर होईल. मुलांची प्रगती राहील. वाद विवाद टाळा. रचनात्मक कामामुळे आर्थिक स्थिती सुधारणार आहे.

**मकर :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा : पूर्व समाजातील प्रतिष्ठीत व्यक्तींच्या भेटी होतील. व्यापारात आपल्या निर्णयाचा फायदा मिळेल.


**सिंह :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:दक्षिण प्रयत्न व दूरदर्शिपणा यामुळे आपल्याला इतरांकडून समर्थन मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**कुंभ :** शुभ रंग: गुलाबी , शुभ दिशा: पूर्व उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका. व्यापारिक संकटामुळे चिंता राहून धावपळ वाढणार आहे.

**कन्या :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: दक्षिण आर्थिक स्थिती चांगली राहिल्याने मन आनंदी राहील. कौटुंबिक चिंता दूर होऊ शकते.

**मीन :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: पश्चिम बुद्धीमत्तेवर अनेक समस्या दूर होतील. अचानक धनप्राप्ती होण्याचा योग आहे. प्रिय व्यक्तिची गाठ होईल.

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. ९५७



### आडवे शब्द

१. राज ठाकरे यांचा राजकीय पक्ष
७. आजूबाजूला
९. नासाडी, खराबी
१०. गोड्या पाण्यातील तांबडा मासा
११. तयार करणे
१२. जोराचा हबका, शिडकावा
१३. सीता, द्रौपदी यांच्या बरोबरीने पंचकन्यांमध्ये समाविष्ट असणारी रावणाची पत्नी
१६. मृत्तिका
१७. कागदाचे कापून ठेवलेले तुकडे
१८. उणीव
१९. धनुष्यबाण
२२. शर्त, पण
२३. बगल
२५. हात
२७. जन्म
२८. घुबड
३०. पूर्वी पंगतीतून ऐकू येणारा ोक–’... नाव घ्या श्रीहरीचे’
३३. कैकेयीच्या दासीचे नाव
३७. मज्जाव, बंदी
३८. खालीच्या विरुद्ध
३९. कोवळा अंकुर
४०. समाजातील दरारा
४२. कबर
४६. माळजमीन, राबता
४७. दया करणारा परमेश्वर
४९. हंगाम
५१. हिम्मत, धैर्य
५३. विष
५४. च्या सह
५६. संध्याकाळ
५८. वाचकांसाठी लिहिणारा
६०. वारकरी संप्रदायाची दीक्षा घेतलेला
६२. चक्र
६३. छोटा खिळा
६५. सुभद्रेचा नवरा
६६. छिद्र
६७. जंगल
६९. गाढव–डुकरांचे आश्रयस्थान
७०. वस्ती
७१. लहानपणी होणारा अस्थमा
७२. मोठे शहर
७३. मन, प्रसन्न असेल तरच अंगी लागते
७४. मोहरी
७५. सोनचाफा

### उभे शब्द

१. गोव्यातील मगोप या राजकीय पक्षाचे विस्तृत नाव
२. नाखुशीचा लग्नप्रकार
३. सृजन
४. महनीय व्यक्तीचा मृत्यू
५. सेनानायक
६. अढी खराब करणारा आंबा
७. आजूबाजूचा प्रदेश
८. श्रद्धेबरोबर महत्त्वाचा असणारा संयम
१२. सम, सारखा
१४. वळून तयार केला जाड धागा
१५. हादरा, मार
१७. सैन्य, ओरिसाची जुनी राजधानी
२०. चंद्र
२०अ. सोने
२१. माणूस
२२. देवाचे देहधारी रूप
२४. गुलकंदाला गोडी आणणारी
२६. च्या साठी
२९. छोटा डोंगर
३१. धमकी, दीर्घ श्वास
३२. एक शेंगभाजी
३४. उंट हाकणारा
३६. अत्यंत उर्मट, उद्धट माणूस या अर्थी शब्दप्रयोग
४१. रोखलेली नजर
४३. इमारतीच्या पायात भरण्याचे दगड
४४. घर
४५. परमेश्वर
४८. धोबी
५०. आवड
५१. चुकवता अथवा बदलता न येणारे
५२. शोभणारी
५५. जास्तीत जास्त व कमीत कमी
५७. जन्म–मृत्यू
५९. रांग
६१. कोयरी
६२. तोंड फिरवल्यास ’टाळणे’, कर्ज असल्यास ’फेडणे’
६३. करवत
६४. स्त्रियांचा एक आश्चर्याचा उद्गार, ’-- -- मन मोराचा कसा पिसारा फुलला’
६५. अकस्मात
६७. वाहून नेणे
६८. नम्र, वाकलेला
६९. पाणी

### जम्बो शब्दकोडे क्र. ९५५ चे उत्तर

आडवे उत्तर १.निवडणूक ५.मतमोजणी ८.पराभव ११.कायम १२.माहितगार १३.टन १४.डबल १५.दादा १६.भुसभुशीत १९.सम २०.किसान २२.वाईट २३.नमाज २५.देह २६.सामान २७.मानस २८.महामती २९.सावधान ३१.साज ३२.पाडस ३५.नर ३६. घमघमाट ३८.धमक ३९.विणकार ४१.रन ४२.अंतर्धान ४३.महा ४४.हो ४५.वचक ४६.कद ४७.नगरसेवक ५१.लिपिक ५३.जर ५४.नारद ५५.थापेबाज ५७.मना ५८.मदनबण ६१.काक ६२.विनायक ६४.अनाथ ६५.माला ६७.चेकर ६८.कोड ६९.नगर ७०.वरकरणी ७३.हार ७५.जनक ७६.तड ७७.बत्तासा ७८.कणव

उभे उत्तर : १.निकाल २.वय ३.डमडम ४.कमालकिमान ५.मतदान ६.तगादा ७.मोर ८.पटाशी ९.भट १०.वनराज १६.भुईसपाट १७.सट १८.तनमनधन १९.सहसा २१.सान २२.वान २४.माळ २६.साधारण २७.माजघर २८.मसलत ३०.वनविहार ३१.साम ३३.मकरंद ३४.सांड ३६.घर ३७.मानव ४०.कलेवर ४२.अंकलिपी ४३.मगर ४६.कडबा ४७.नजर ४८.सेनानायक ४९.कदम ५०.महान ५२.कथाकथन ५६.जगाला ५७. मनाचे ोक ५९.दमणूक ६०.बाप ६१.काना ६३.करवत ६४.अडकित्ता ६५.मारहाण ६६.सावज ७१.रड ७२.रस्ता ७४.रव

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवसाची जिल्हाधिकारी कार्यालयात शपथ

पुणे (दैनिक संध्या) : दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात शपथविधी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी तहसीलदार श्वेता पवार यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना दहशतवाद आणि हिंसाचाराला विरोध करण्याची तसेच शांतता, सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मता जपण्याची शपथ दिली. दहशतवाद व हिंसाचारामुळे समाजात भीती, अस्थिरता आणि द्वेषाचे वातावरण निर्माण होते. अशा प्रवृत्तींपासून दूर राहून लोकशाही मूल्यांचे जतन करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सजग राहण्याची गरज असल्याचे यावेळी सांगण्यात आले. तसेच समाजात शांतता, बंधुता आणि परस्पर सहकार्याची भावना वाढीस लागावी, यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यात आले. या शपथविधी कार्यक्रमात नायब तहसीलदार सुयोग बेंद्रे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या माध्यमातून दहशतवाद आणि हिंसाचारमुक्त समाज निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला.

### पुनर्चाचणी व अनुज्ञप्ती नूतनीकरणाचे कामकाज 25 मेपासून पूर्ववत सुरु

पुणे (दैनिक संध्या) : प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांच्या आळंदी रोड कार्यालय परिसरात स्वयंचलित वाहनचालक चाचणी मार्ग (एडीटीटी) चे कामकाज सुरू असल्याने जागेच्या उपलब्धतेअभावी हलक्या मोटार वाहन संवर्गातील अनुज्ञप्ती नूतनीकरणासंदर्भातील पुनर्चाचणी व नूतनीकरणाचे कामकाज आयडीटीआर येथे करण्यात येत होते. मात्र, नागरिकांच्या सोयीसाठी हलक्या मोटार वाहन संवर्गातील पुनर्चाचणी व अनुज्ञप्ती नूतनीकरणाचे कामकाज दि. २५ मे २०२६ पासून पूर्वीप्रमाणे आळंदी रोड कार्यालय येथे पुन्हा सुरू करण्यात येणार असल्याची माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांनी दिली आहे. नागरिकांनी याची नोंद घ्यावी तसेच अनुज्ञप्ती नूतनीकरणाची कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पशुसंवर्धन विभागाचे सूक्ष्म नियोजन; पारदर्शक अंमलबजावणीवर भर

■ मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेसाठी महाडीबीटी पोर्टलवरून ऑनलाइन अर्ज प्रक्रिया लवकरच सुरू होणार

पुणे (दैनिक संध्या) : पशुसंवर्धन आयुक्तालय तर्फे राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने अंतर्गत ऑनलाइन अर्ज प्रक्रिया महाडीबीटी पोर्टलचे तांत्रिक काम पूर्ण होताच सुरू करण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी दिली. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला चालना देणे, पशुपालन व्यवसायाला आधुनिक उद्योजकतेचे स्वरूप देणे आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. राज्यातील युवक, शेतकरी आणि पशुपालकांमध्ये या योजनेबाबत मोठा उत्साह दिसून येत असून, योजनेची अंमलबजावणी वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने व्हावी यासाठी पशुसंवर्धन विभागाने सूक्ष्म नियोजन सुरू केले आहे. लाभार्थ्यांना घरबसल्या अर्ज करता यावा यासाठी महाडीबीटी पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाइन अर्ज प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. यासाठी महाआयटी कडून विशेष पोर्टल विकसित करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. पोर्टलचे काम पूर्ण होताच योजना अधिकृतपणे सुरू झाल्याची घोषणा करण्यात येणार असल्याचे डॉ. किरण पाटील यांनी स्पष्ट केले. योजनेसंदर्भातील अधिकृत माहिती, मार्गदर्शन अथवा शंकानिरसनासाठी इच्छुक लाभार्थ्यांनी टोल-फ्री क्रमांक १९६२ वर संपर्क साधावा, तसेच नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधून माहिती घ्यावी, असे आवाहनही पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे.

### पुणे स्टेशन परिसरात दुर्मिळ वन्यजीवांची तस्करी रोखली; 'डीआरआय'ची कारवाई

पुणे (दैनिक संध्या) : भीमाशंकर परिसरातील दुर्मिळ शेकरुंची तस्करी करण्याचा प्रकार महसूल गुप्तचर संचलनालयाने (डिरोक्टरेट रेव्हेन्यू इंटेलिजन्स, पुणे कार्यालय)उघडकीस आणली. या प्रकरणी 'डीआरआय'च्या पथकाने दोघांना ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून खोक्यात लपवलेले तीन शेकरु, तसेच सात कासवे ताब्यात घेण्यात आली आहेत. पुणे रेल्वे स्थानक परिसरात वन्यजीवांची तस्करी करणारे दोघे जण थांबल्याची माहिती 'डीआरआय'च्या पुणे विभागाच्या पथकाला मिळाली. पथकाने स्टेशन परिसरात सापळा लावला. तेथे संशयास्पद फिरणाऱ्या एकाला ताब्यात घेतले. त्याची झडती घेणअयात आली. तेव्हा दोन पुठ्याच्या खोक्यात तीन शेकरू (मलबार जायंट स्क्विरल) आढळून आले. ताब्यात घेण्यात आलेल्या एकाची चौकशी करण्यात आली. तेव्हा एकाकडे 'इंडियन स्टार टॉर्टराईज' प्रजातीची सात कासवे असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर 'डीआरआय'च्या पथकाने त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून सात कासवे जप्त करण्यात आली. वन्यजीव कायद्यान्वये ही कारवाई करण्यात आली. 'शेकरू आणि भारतीय स्टार कासव हे दोन्ही प्राणी वन्यजीव (संरक्षण) कायदा १९२ च्या अनुसुची – एक (शेड्युल्ड वन) अंतर्गत येतात. या प्राण्यांना कायद्यानुसनार संरक्षण मिळालेले आहे. त्यांची शिका करणे, बाळगणे, वाहतूक, तसेच विक्री करण्यास बंदी आहे. दोन्ही आरोपींना कायदेशीर कारवाई करण्यासाठी वन विभागाच्या कार्यालयाकडे सोपविण्यात आले आहे. त्यांच्याकडून जप्त करण्यात आलेले शेकरू आणि सात कासवे वनविभागाकडे सोपविण्यात आली आहेत', अशी माहिती डीआरआयच्या अधिकाऱ्यांनी दिली. 'वन्यजीवांची तस्करी करणाऱ्यांविरुद्ध यापुढील काळत कडक कारवाई करण्यात येणार आहे', असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

### "म्हाडाचे घर मिळवून देतो" म्हणत दाम्पत्याला गंडा; 74 लाखांची फसवणूक

पुणे (दैनिक संध्या) : म्हाडाचे रो-हाउस खरेदी करून देतो असे सांगून एका दाम्पत्याचा विश्वास संपादन करत त्यांची तब्बल ७४ लाख २० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आली. ही घटना मार्च २०२४ ते मे २०२६ या कालावधीत संत तुकारामनगर, पिंपरी येथे घडली.या प्रकरणात ४४ वर्षीय महिलेने संत तुकारामनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी आपापसात संगनमत करून संत तुकारामनगर येथील म्हाडाचे रो-हाउस खरेदी करून देतो असे फिर्यादी व त्यांच्या पतीला सांगितले. आरोपींनी त्यांचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडून वेळोवेळी रोख आणि ऑनलाईन स्वरूपात एकूण ७४ लाख २० हजार रुपये घेतले आणि घर न देता फसवणूक केली. संत तुकारामनगर पोलीस तपास करत आहेत.

### भरधाव ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

पुणे (दैनिक संध्या) : भरधाव वेगातील एका ट्रकने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात एका दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. ही घटना बुधवारी (२० मे) रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास स्पाईन रोड, एमआयडीसी भोसरी येथे घडली. उत्तम रणपिसे असे मृत्यू झालेल्या दुचाकी चालकाचे नाव आहे.

# स्व. राजीव गांधी कला गौरव पुरस्काराने प्रिया बेर्डे सन्मानित

पुणे (दै. संध्या)




प्रियंकाजी महिला उद्योग संस्था व वसंतदादा सेवा संस्था तर्फे यंदा जेष्ठ अभिनेत्री श्रीमती प्रिया बेर्डे यांना स्व. राजीव गांधी कला गौरव पुरस्कार २०२६ मा. हर्षवर्धन सपकाळ (अध्यक्ष, महाराष्ट्र काँग्रेस पक्ष ) यांच्या हस्ते व प्रमुख पाहुणे मा. उल्हास पवार ( जेष्ठ विचारवंत ), कार्यक्रमाचे संयोजक सौ. संजीवनी बालगुडे ( अध्यक्ष, प्रियंकाजी महिला उद्योग संस्था ), संजय बालगुडे ( अध्यक्ष, वसंतदादा सेवा संस्था ) यांच्या उपस्थितीत शॉल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविक करताना संजय बालगुडे यांनी स्व. राजीव गांधी यांच्या अनेक जुने किस्से सादर करत खरे भारताचे शिल्पकार राजीव गांधी आहेत.

मा. हर्षवर्धन सपकाळ आपले विचार व्यक्त करताना प्रिया बेर्डे यांचे हा पुरस्कार स्वीकारला यासाठी धन्यवाद दिले. माजी पंतप्रधान राजीव गांधी हे डिजिटल क्रांती चे खरे जनक आहेत. भारतात संगणक आणि दूरसंचार क्रांती घडवून आणण्याचे मोठे श्रेय राजीव गांधी यांना जाते. युवकांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्याचे काम काम केले. राजीव गांधी यांनी इन्फॉर्मशन टेक्नोलोंजि शिक्षणाचा सुरवात पुण्यातून केली. शिक्षणासठी पहिल्या पणती हा मान पुण्याला मिळाला. अनेक जण इंजिनियर झाले व पुण्याच्या घरातला प्रत्येक माणूस आज विदेशात आहे हा राजीव गांधी मुळेच झाले. बालगुडे साहेब आपण अनेक वर्षांपासून हा उपक्रम राबवत आहेत याचा मला मनापासून आपले अभिनंदन करतो. मला प्रिया बेर्डे यांचा सन्मान करण्याची संधी मिळाली, रसिक या नात्याने आपण कला क्षेत्रात दिलेले योगदान चे मनापासून आभार.

उल्हास पवार यांनी सुद्धा या प्रसंगी आपले विचार व्यक्त केले व प्रिया बेर्डे यांना शुभेच्छा दिल्या.

पुरस्कारार्थी प्रिया बेर्डे आपले विचार व्यक्त करताना म्हणाले, माझे कुटूंब माझे नातेवाईक सर्व जण या कला क्षेत्रात योगदान दिले. १९८५ साली राजीव गांधी पंतप्रधान झाले तेव्हा त्यांनी फ्रान्स ला फेस्टिवल ऑफ इंडिया चे आयोजन केले होते. लहान पानापासून माझी इच्छा होती विदेशात जायचे आणि माझ्या मामी ने मला फ्रान्सला जायचे आहे कला सादर करण्यासाठी आणि त्यात भारताकडून मला जाण्याची संधी मिळाली. राजीव गांधी यांनी हा फेस्टिवल ऑफ इंडिया चे आयोजन केले आहे, अनेक प्रांतातून लोकं आपली लोक कला सदार करणार आहे. मी लहान मुलगी महाराष्ट्र कडून सहभाग घेणार आहे याचा खूप मला आनंद झाला. साक्षात राजीव गांधी या फेस्टिवल ऑफ इंडिया च्या उदघाटनाला तिथे आले आणि प्रत्येक्ष त्यांना पाहण्याची संधी मला मिळाली. येवढा तरुण पंतप्रधान आपल्या भारताला लाभला आहे, त्यावेळी मी १४ ते १५ वर्षाची होती, मी प्रचंड भारावून गेली होती. पहिले पंतप्रधान होते ज्यांनी पहिल्यांदा कलाकारांना विदेश मध्ये पोचवलं, हे सर्व श्रेय राजीव गांधी यांना जाते. कार्यक्रमाचे आयोजन सौ. संजीवनी बालगुडे यांनी केले व आलेल्या सर्वांचे आभार त्यांनी व्यक्त केले.

## भांडारकर संस्थेच्या वतीने प्राचीन कृषी पध्दतीचा अभ्यासक्रम विकसित

पुणे (दै. संध्या)

**शेतकऱ्यांना मिळणार प्राचीन शेतीविषयक धडे**



प्राचीन काळापासून आपल्या देशातील विविध भागांमध्ये, विविध राज्यांमध्ये असलेले जमिनीचे प्रकार आणि तेथील हवामान यानुसार होत असलेली शेती, शेतीचे प्रयोग याची शास्त्रशुध्द माहिती आजच्या शेतकऱ्यांना व्हावी या उद्देशाने भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेने कृषी पध्दतीचा अभ्यासक्रम विकसित केला असल्याची माहिती भांडारकर संस्थेचे कार्याध्यक्ष भूपाल पटवर्धन आणि नियामक परिषदेचे सदस्य मनोज एरंडे यांनी आज येथे दिली.

पर्यावरणपूरक शेती, शेतीची कामे, मातीची पोत कशी सुधारावी यासारखी शेतकऱ्यांना माहिती व्हावी व तसेच प्राचीन भारतातील कृषी पद्धत कशी होती या विषयाची शेतकऱ्यांना माहिती मिळावी व या पद्धतीने कृषी पध्दतीचा अभ्यासक्रम भांडारकर संस्थेच्या वतीने विकसित करण्यात आला आहे. यासाठी नांदेडच्या भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना यांच्या संयुक्त सहकार्याने प्राचीन भारतातील कृषी पद्धतीवर असलेला हा अभ्यासक्रम शेतकऱ्यांना ऑनलाईन पद्धतीने करता येणार आहे. यासाठी कारखान्याचे अध्यक्ष नरेंद्र चव्हाण यांनी पुढाकार घेतला आहे. यावेळी चव्हाण म्हणाले की, प्राचीन भारतीय शेतीचा अभ्यास आजपर्यंत लोकांपर्यंत पोहचलेला नाही, या पद्धतीच्या अभ्यासक्रमानुसार तळागाळातील लोकांना त्याची चांगली माहिती मिळू शकेल. अशा प्रकारचा देशातील हा पहिलाच अभ्यासक्रम असून शेतकऱ्यांना एक नवीन संधी यानिमित्ताने उपलब्ध होणार आहे. दोन्ही संस्थामधील त्यासंबंधीचा सामंजस्य करार नांदेड येथे नुकताच करण्यात आला. त्यावेळी कारखान्याचे अध्यक्ष नरेंद्र चव्हाण, संचालक व्यंकटराव कल्याणकर, कार्यकारी संचालक महेंद्र घोलप, वित्त व्यवस्थापक निलेश गाढे, सरव्यवस्थापक गजानन सबनीस तसेच भांडारकर संस्थेचे मनोज एरंडे, चिन्मय भांडारी आदी उपस्थित होते. याबरोबरच स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि भांडारकर संस्थेमध्ये देखील एक सामंजस्य करार नुकताच करण्यात आला. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, संचालक डॉ. शैलेश वढेर आणि अधिष्ठाता एम. के. पाटील उपस्थित होते. या करारानुसार छत्रपती शिवाजी महाराजांची प्रशासन नीती, मोडी लिपी, भारतीय ज्ञान परंपरा यासंबंधीचे विविध विषय विद्यापीठाच्या संबंधित विभागांमधील विद्यार्थ्यांना भांडारकर संस्थेद्वारे ऑनलाईन पध्दतीने शिकवण्यात येणार आहेत, अशीही माहिती एरंडे यांनी यावेळी दिली. भांडारकर संस्थेतर्फे विविध विषयांचे ऑनलाईन अभ्यासक्रम सातत्याने सुरु असून अभ्यासकांनी संस्थेच्या वेबसाईटला भेट द्यावी असे आवाहन चिन्मय भांडारी यांनी केले आहे.


## अन्नप्रक्रिया उद्योगाला मोठा फायदा

पुणे (दै. संध्या)

भारत- न्यूझीलंड यांच्यात झालेल्या मुक्त व्यापार करारामुळे महाराष्ट्रातील उद्योगांसाठी निर्यात क्षेत्रातील संधींची अनेक कवाडे खुली होणार आहेत. पुणे, पिंपरी- चिंचवड, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर येथील उद्योगांना या निर्यात संधींचा मोठा फायदा होऊ शकतो. प्रामुख्याने सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना (एमएसएमई) जागतिक बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. यामुळे आगामी काळात या भागात गुंतवणुकीसह रोजगारात वाढ होणार आहे. 'महाराष्ट्रातून न्यूझीलंडला होणाऱ्या निर्यातीत अभियांत्रिकी वस्तूंचा सर्वात मोठा वाटा आहे. त्यानंतर रत्ने आणि दागिने, रसायने, औषधे आणि इलेक्ट्रॉनिक उत्पादनांचा क्रमांक लागतो. या करारामुळे निर्यातीतील अडथळे कमी होऊन, महाराष्ट्रातील उद्योगांना न्यूझीलंडच्या बाजारपेठेत सहज प्रवेश मिळेल, अशी अपेक्षा आहे. त्यातही देशातील प्रमुख उत्पादन केंद्रांपैकी एक असलेल्या पुण्याला अन्य क्षेत्रांबरोबरच माहिती तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान क्षेत्रातील योगदानामुळे या कराराचा लक्षणीय फायदा होणार आहे,' असे मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चरने (एमसीसीआयए) म्हटले आहे. 'महाराष्ट्रातील अन्नप्रक्रिया विशेषतः तयार खाद्यपदार्थ, मिठाई, पौष्टिक खाद्यपदार्थ, तसेच कृषी व्यवसायातील सेंद्रिय उत्पादने यांना शून्य निर्यात शुल्काचा लाभ मिळण्याची अपेक्षा आहे. न्यूझीलंडची उच्च क्रयशक्ती आणि तेथील नागरिकांची आंतरराष्ट्रीय खाद्यपदार्थांची आवड, यामुळे दोन्ही उद्योगांना तेथे मोठ्या संधी आहेत. या करारामुळे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग आणि नवउद्यमींना (स्टार्टअप) फायदा अपेक्षित आहे. महिला आणि युवा उद्योजकतेला चालना देण्यावरही करारात विशेष भर देण्यात आला आहे,' असे 'एमसीसीआयए'ने नमूद केले आहे.

## शस्त्र बाळगणाऱ्यास अटक

पुणे (दै. संध्या)



बेकायदेशीरपणे शस्त्र बाळगल्या प्रकरणी पोलिसांनी एका तरुणाला अटक केली आहे. ही कारवाई गुरुवारी (२१ मे) सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास पिंपरी येथे करण्यात आली.मोहसीन समीर सय्यद (२५, खराळवाडी, पिंपरी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. संत तुकारामनगर पोलीस ठाण्याचे पोलीस शिपाई अक्षय साळुंखे यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हिंदुस्तान अँटी बायोटीक कंपनीच्या मोकळ्या मैदानात, पिंपरी येथे एक जण शस्त्र घेऊन आल्याची माहिती संत तुकाराम नगर पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा लावून मोहसीन सय्यद याला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे एक सत्तुर हे शस्त्र मिळवून आले. त्याला पोलिसांनी अटक केली आहे. संत तुकाराम नगर पोलीस तपास करत आहेत.

## अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. प्रसाद जोशी यांना ग्रीन सोल्युशन्सतर्फे जीवनगौरव पुरस्कार

### चौदाव्या वर्धापनदिनी पर्यावरण क्षेत्रातील कार्याबद्दल आरती भोसले यांचा विशेष सन्मान

पुणे (दै. संध्या)





प्रदूषण नियंत्रण व पर्यावरण संवर्धन क्षेत्रात सेवा पुरवणाऱ्या देशातील अग्रणी ग्रीन सोल्युशन्स संस्थेच्या दिला जाणारा जीवनगौरव पुरस्कार यंदा ज्येष्ठ अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. प्रसाद जोशी यांना जाहीर झाला आहे. ग्रीन सोल्युशन्सच्या १४ व्या वर्धापन दिनानिमित्त उद्या शनिवारी (ता. २३) सायंकाळी ५.३० वाजता हॉटेल ऑर्चिड, बालेवाडी, पुणे येथे आयोजित कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण प्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे व संपादक संजय आवटे यांच्या हस्ते होणार आहे.

तसेच भारत-नॉर्वे ग्रीन स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप समिटमध्ये सहभागी होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उद्योग प्रतिनिधी मंडळातील टॉप २० प्रतिनिधींमध्ये निवड झालेल्या पुण्यातील ग्रीनएक्स एन्व्हायर्नमेंटलच्या संस्थापक व व्यवस्थापकीय संचालिका आरती भोसले यांचाही विशेष सन्मान करण्यात येणार आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे निवृत्त सहसंचालक शंकर वाघमारे, निवृत्त प्रादेशिक अधिकारी एल. एस. भड व निवृत्त उपप्रादेशिक अधिकारी किशोर केर्लीकर यांची विशेष उपस्थिती असणार आहे.

ग्रीन सोल्युशन्स संस्थेने गेल्या १४ वर्षांत देशविदेशातील हजारो उद्योगांमधे प्रदूषण नियंत्रण यंत्रणा उभारली आहे. संस्थेमार्फत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संमतीपत्र, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विषयक अनुज्ञप्ती, पर्यावरण विषयक अनुज्ञप्ती व संलग्न सेवा दिल्या जातात. ग्रीनेक्स एनव्हायरंमेंटलमार्फत उद्योजकांना लाईफ सायकल असेसमेंट, एनव्हायरंमेंटल प्रॉडक्ट डिक्लरेशन (इपीडी), कार्बन क्रेडिट, नेट झीरो इत्यादी सेवा पुरविण्यात येतात, असे ग्रीन सोल्युशन्सचे संस्थापक सागर अहिवळे यांनी नमूद केले.

# ११ वर्षांनंतर 'देऊळ बंद २'ची ब्लॉकबस्टर एन्ट्री

**गुरुवारी ब्रह्ममुहूर्तावर सकाळी साडेपाच वाजता थिएटरबाहेर गर्दी; शो हाऊसफुल्ल**

पुणे (दै. संध्या)



२०१३ साली प्रदर्शित झालेल्या सुपरहिट 'देऊळ बंद' या चित्रपटाने मराठी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत बॉक्स ऑफिसवर मोठा गाजावाजा केला होता. श्रद्धा विरुद्ध विज्ञान यांचा संगम असलेल्या या चित्रपटाने त्या काळात प्रचंड लोकप्रियता मिळवली होती. तब्बल ११ वर्षांनंतर प्रदर्शित झालेल्या 'देऊळ बंद २ – आता परीक्षा देवाची' या बहुचर्चित सिक्वेलनेही प्रदर्शित होताच मराठी चित्रपटसृष्टीत ब्लॉकबस्टर एन्ट्री करत प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळवला आहे.

पारंपरिक शुक्रवारऐवजी गुरुवारी सकाळी सहा वाजता, गुरुपुष्यामृत योग आणि ब्रह्ममुहूर्त साधत चित्रपट प्रदर्शित करण्यात आला. विशेष म्हणजे, पहाटेच्या शोसाठीही प्रेक्षकांनी थिएटरमध्ये अक्षरशः गर्दी केली. राज्यातील अनेक चित्रपटगृहांमध्ये पहिल्याच दिवशी शो हाऊसफुल्ल झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. पुणे, पिंपरी-चिंचवड, मुंबई, नाशिक, पश्चिम महाराष्ट्र, जळगाव, विदर्भ आणि मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रात चित्रपट ब्लॉकबस्टर ठरत आहे. मुंबईतील मराठीबहुल भांडुप, कल्याण, नालासोपारा, अंधेरी, ठाणे आणि लोअर परळ परिसरातही 'देऊळ बंद २'ची प्रचंड क्रेझ पाहायला मिळाली. या भागातील अनेक थिएटरचे सर्व शो हाऊसफुल्ल झाले असून, तिकीट खिडक्यांवर गर्दी झाली आहे. 'बुक माय शो' या ऑनलाइन बुकिंग प्लॅटफॉर्मवरही तिकिटांसाठी मोठी झुंबड उडाल्याचे दिसून आले.

सोशल मीडियावरही 'देऊळ बंद २'ची जोरदार चर्चा रंगली असून, प्रेक्षकांनी चित्रपटातील संवाद, दमदार कथानक, भावनिक प्रसंग, संगीत आणि कलाकारांच्या अभिनयाचे भरभरून कौतुक केले आहे.

या चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन प्रसिद्ध दिग्दर्शक प्रवीण विठ्ठल तरडे यांनी केले आहे. त्यांच्या वास्तववादी मांडणीमुळे आणि प्रभावी लेखनशैलीमुळे चित्रपट अधिक प्रभावी ठरला आहे. चित्रपटात ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी पुन्हा एकदा स्वामी समर्थांच्या दैवी भूमिकेत झळकले असून, त्यांच्या अभिनयाला प्रेक्षकांची विशेष दाद मिळत आहे. त्यांच्या प्रभावी संवादफेकीतून आणि भावनिक अभिनयातून श्रद्धेची ताकद प्रभावीपणे प्रकट होताना दिसते.

वटवृक्ष इंटरटेनमेंट निर्मित या भव्य चित्रपटाची निर्मिती कैलास वाणी, सौ. जयश्री वाणी, कैवल्य वाणी आणि जुईली वाणी-सूर्यवंशी यांनी केली आहे. उत्कृष्ट छायांकन, प्रभावी पार्श्वसंगीत आणि भव्य सादरीकरणामुळे चित्रपट अधिक उठावदार ठरला आहे.

प्रदर्शित होताच मिळालेल्या अभूतपूर्व प्रतिसादामुळे 'देऊळ बंद २ – आता परीक्षा देवाची' हा चित्रपट मराठी चित्रपटसृष्टीतील यंदाचा सर्वाधिक चर्चेत असलेला आणि संभाव्य ब्लॉकबस्टर चित्रपट ठरणार असल्याची चर्चा चित्रपट वर्तुळात सुरू झाली आहे.

**विक्रमी प्रतिसाद**

पहिल्याच दिवशी संपूर्ण महाराष्ट्रातील ५०० सिनेमागृहांमध्ये चित्रपटाचे २ हजारांहून अधिक शो प्रदर्शित झाले. पुण्यातील सिटी प्राईड मल्टिप्लेक्समध्ये 'देऊळ बंद २'चे तब्बल २५ शो हाऊसफुल्ल झाले आहेत. एका मराठी चित्रपटाला मिळालेला हा प्रतिसाद विक्रमी मानला जात असून, चित्रपटाच्या लोकप्रियतेची जोरदार चर्चा सुरू आहे. दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीत चित्रपट प्रदर्शित करताना मध्यरात्रीचे शो, विशेष मुहूर्त किंवा पारंपरिक दिवसांऐवजी वेगळ्या दिवशी रिलीज करण्याचे प्रयोग केले जातात. त्याच धर्तीवर 'देऊळ बंद २' हा चित्रपट पारंपरिक शुक्रवारऐवजी थेट गुरुवारी ब्रह्ममुहूर्तावर प्रदर्शित करण्यात आला. विशेष म्हणजे, या प्रयोगालाही प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत थिएटरमध्ये प्रचंड गर्दी केली आणि मराठी सिनेमातील सर्वात चर्चित व दमदार ओपनिंगपैकी एक ओपनिंग चित्रपटाला मिळाल्याची चर्चा रंगली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



# पेट्रोल-डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध; भीतीपोटी अनावश्यक खरेदी टाळावी : छगन भुजबळ

मुंबई (दैनिक संध्या) : गेल्या काही दिवसांपासून आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे पेट्रोल-डिझेलच्या दरांमध्ये चढ-उतार पाहायला मिळत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यात इंधनटंचाई निर्माण होण्याच्या अफवा पसरवल्या जात आहेत. मात्र, महाराष्ट्रात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची माहिती राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे. माध्यमांशी संवाद साधताना भुजबळ म्हणाले की, राज्यात कोणत्याही प्रकारची इंधनटंचाई नाही. त्यामुळे नागरिकांनी भीतीपोटी अतिरिक्त पेट्रोल-डिझेल खरेदी करून साठवणूक करू नये. गेल्या काही दिवसांत अनेक ठिकाणी गरजेपेक्षा अधिक इंधन खरेदी होत असल्याचे निदर्शनास आले असून, त्यामुळे मे महिन्यात नेहमीच्या तुलनेत सुमारे २० टक्के अधिक पेट्रोल-डिझेलची विक्री झाल्याची माहिती त्यांनी दिली. "देशाचे पंतप्रधान, केंद्र सरकार आणि राज्य सरकार प्रत्येक नागरिकाला पुरेशा प्रमाणात इंधन उपलब्ध करून देण्यास सक्षम आहेत. त्यामुळे अफवा किंवा भीतीच्या वातावरणामुळे अतिरिक्त साठा करण्याची आवश्यकता नाही," असे आवाहन छगन भुजबळ यांनी केले. यावेळी त्यांनी राज्यातील विविध जिल्ह्यांमधील गेल्या काही दिवसांतील इंधन विक्रीची आकडेवारीही माध्यमांसमोर मांडली. नागरिकांनी संयम बाळगून आवश्यकतेनुसारच इंधन खरेदी करावे आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले.

# मेट्रोच्या तिकीट रांगेत उभे राहण्याची गरज नाही; 'उबर'च्या ॲपवर मेट्रो तिकीट उपलब्ध

पुणे(दैनिक संध्या) : 'उबर'ने पुण्यात आपल्या ॲपवर मेट्रो तिकिटाची सेवा सुरू केली आहे. 'उबर'तर्फे आज ही घोषणा करण्यात आली. 'ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्स'च्या (ओएनडीसी) माध्यमातून उपलब्ध करण्यात आलेल्या या सुविधेमुळे पुणेकरांचा दैनंदिन प्रवास अधिक सोपा आणि सुलभ होणार आहे. आजपासून प्रवाशांना 'उबर'च्या ॲपमधून मेट्रो प्रवासाचे नियोजन करता येणार असून, क्यूआर-आधारित तिकीट थेट खरेदी करता येणार आहे. त्यामुळे तिकिटाच्या रांगेत उभे राहण्याची किंवा कोणतेही वेगळे ॲप वापरण्याची गरज राहणार नाही. दिल्ली, मुंबई, बंगळुरू आणि चेन्नई यांच्यानंतर उबरने मेट्रो तिकीट सेवा सुरू केलेले पुणे हे भारतातील पाचवे शहर ठरले आहे. पुणे शहरात प्रवासाच्या अधिक वेगवान, स्मार्ट आणि एकात्मिक पर्यायांची मागणी वाढत असताना ही सेवा सुरू करण्यात आली आहे. उबरच्या ॲपवरून मेट्रोचे तिकीट बुक करणाऱ्या प्रवाशांना मर्यादित कालावधीसाठी तिकिटावर ५० टक्के सूट मिळणार असून, कमाल १० रुपयांपर्यंत सवलत दिली जाणार आहे. 'उबर'चे मुख्य कार्यकारी अधिकारी दारा खोस्रोशाही यांनी नुकत्याच झालेल्या आपल्या भारत दौऱ्यात सांगितले की, देशभरात उबर ॲपच्या माध्यमातून आतापर्यंत १ कोटींहून अधिक मेट्रो प्रवास बुक करण्यात आले आहेत. यामुळे सार्वजनिक वाहतुकीच्या एकात्मिक सेवांची वाढती लोकप्रियता दिसून येते. 'ओएनडीसी'च्या नेटवर्कवर आधारित या सुविधा सार्वजनिक वाहतूक आणि लास्ट-माइल प्रवास सेवा एकत्र आणण्याच्या 'उबर'च्या प्रयत्नांचा भाग आहेत. पुण्यातील प्रवाशांना आता उबर ॲपवरून 'यूपीआय'च्या माध्यमातून थेट मेट्रो तिकीट बुक करता येणार आहे. तसेच पुढील प्रवासासाठी 'उबर ऑटो', 'बाईक', 'गो' अशा प्रवासाच्या इतर पर्यायांचाही वापर करता येणार आहे. 'उबर'च्या भारतातील व दक्षिण आशियातील स्ट्रॅटेजिक इनिशिएटिव्ज विभागाच्या प्रमुख नेहा कपूर म्हणाल्या, "उबरवर मेट्रो तिकीट सेवा उपलब्ध झाल्याने सार्वजनिक वाहतूक आणि लास्ट-माइल मोबिलिटी या गोष्टी एका प्लॅटफॉर्मवर आणल्या गेल्या आहेत. त्यातून पुणेकरांचा दैनंदिन प्रवास अधिक सोपा होणार आहे. ही सेवा सुरू झालेले पुणे हे पाचवे शहर ठरले आहे. अधिकाधिक प्रवाशांना अखंड आणि सुलभ प्रवासाचा अनुभव देताना आम्हाला आनंद होत आहे. देशभरात उबरच्या माध्यमातून आतापर्यंत १ कोटींहून अधिक वेळा मेट्रो प्रवासाची तिकिटे बुक करण्यात आली आहेत. शहरांमध्ये अधिक वेगवान आणि कनेक्टेड अशा प्रवासाच्या पर्यायांची मागणी सातत्याने वाढताना दिसत आहे. 'डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर' व्यवस्थेमुळे शहरातील वाहतुकीचा अनुभव मोठ्या प्रमाणावर कसा बदलत आहे, याचे हे प्रभावी उदाहरण आहे."



# 'गंगा माई की बेटियाँ': नम्रता प्रधान साकारणार सहानाची भूमिका

पुणे(दैनिक संध्या) : झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका "गंगा माई की बेटियाँ" सध्या टीआरपीमध्ये आघाडीवर असून तिची रंजक कथा आणि सिद्धू (शिझान खान) व स्नेहा (अमनदीप सिधू) यांच्या नात्याचा प्रवास प्रेक्षकांच्या मनाला खूप भावत आहे. आता या मालिकेत सृष्टी जैनच्या जागी नम्रता प्रधान 'सहाना'च्या भूमिकेत दिसणार आहे. मराठी मनोरंजन उद्योगात लोकप्रिय चेहरा असलेली नम्रता या नव्या भूमिकेबद्दल खूप उत्साहात आहे. 'सहाना'सारखी भूमिका साकारणे आणि "गंगा माई की बेटियाँ" सारख्या मालिकेचा भाग होणे हे तिच्यासाठी स्वप्न साकार झाल्यासारखे आहे असे तिने सांगितले. सहाना ही भूमिका साकारण्याबद्दल नम्रता प्रधान म्हणाली, "'गंगा माई की बेटियाँ' मध्ये सहानाची भूमिका करणे माझ्यासाठी खूप खास आणि उत्साहवर्धक प्रवास आहे. सहानाकडे मला सर्वांत जास्त आकर्षित केले ते तिच्या साधेपणाने. तिचा लूक, तिच्या भावना आणि ती स्वतःला ज्या सुंदर पद्धतीने सादर करते ते मला खूप आवडले. आजच्या काळात इतकी साधी, कुटुंबाला महत्त्व देणारी आणि तरीही धाडसी आणि आपल्या माणसांसाठी नेहमी ठामपणे उभी राहणारी व्यक्तिरेखा क्वचितच पाहायला मिळते. मी या भूमिकेसाठी मनापासून मेहनत घेत आहे आणि प्रेक्षकांकडूनही तितकंच प्रेम आणि स्वीकार मिळेल अशी मला आशा आहे. नव्या चेहऱ्याशी जुळवून घेण्यासाठी प्रेक्षकांना थोडा वेळ लागू शकतो हे मला माहीत आहे. पण सहानाची कहाणी सगळ्यांना जवळची, भावूक आणि लक्षात राहील अशी बनवण्यासाठी मी माझे पूर्ण प्रयत्न करणार आहे." आता नम्रता प्रधान सहानाच्या भूमिकेत दिसणार असल्यामुळे ती या व्यक्तिरेखेमध्ये काय नवीन रंग भरेल आणि आपल्या सकारात्मक व मोहक शैलीत सहानाच्या प्रवासाला कोणता नवा पैलू आणि खोली देईल हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. पहा 'गंगा माई की बेटियाँ' दररोज रात्री 9 वाजता फक्त झी टीव्हीवर!

## नागरिकांना दिलासा

# चाकणला विजेच्या कडकडाटात मुसळधार पाऊस



**चाकण (दै. संध्या) :**

दिवसभर वाढलेल्या उकाड्यानंतर शुक्रवारी (दि.२२) सायंकाळी अचानक विजेच्या कडकडाटात मुसळधार पावसाने चाकणला झोडपून काढले. दुपारी पावणे चार नंतर वातावरणात अचानक बदल होत पावसाने जोर धरला. या अनपेक्षित पावसामुळे नागरिकांची एकच धावपळ उडाली.

मागील महिनाभरापासून वाढत्या तापमानामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना या पावसाने काहीसा दिलासा दिला. अंगाची लाहीलाही करणाऱ्या उष्णतेत हा पाऊस दिलासादायक ठरला. मात्र, दुसरीकडे शेतकऱ्यांसाठी ही चिंतेची बाब ठरत आहे. मका, हरभरा, ज्वारी व गहू यांसारखी पिके सध्या काढणीच्या टप्प्यात असल्याने या पावसाचा फटका बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अचानक कोसळलेल्या पावसामुळे वीटभट्ट्यांवर काम करणाऱ्यांची तारांबळ उडाली. वीटा भिजू नयेत म्हणून त्या झाकण्यासाठी कामगारांची धावपळ सुरू होती. तसेच चाकण बाजारात विक्रीसाठी आलेला कांदा भिजला. मुसळधार पावसामुळे शहरातील वीज पुरवठाही काही काळासाठी खंडित झाला. विजेच्या कडकडाटात झालेल्या या पावसाने नागरिकांना उकाड्यातून दिलासा मिळाला असला तरी शेतकऱ्यांच्या अडचणीत वाढ केली आहे. चाकणला महामार्गावर खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी तुंबल्याने काही भागात वाहतूक विस्कळीत झाली होती.

# महावितरणचे संचालक श्री. राजेंद्र पवार यांचा 'ग्लोबल एचआर लीडर ऑफ द इयर'ने सन्मान

## नवी दिल्लीतील जागतिक ऊर्जा नेतृत्व परिषदेत मानाचा पुरस्कार

**मुंबई (दै. संध्या) :**




जगभरातील सरकारी, औद्योगिक, शैक्षणिक व संशोधन संस्थांच्या समन्वयातून ऊर्जा व पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या ग्लोबल एनर्जी अँण्ड एन्व्हायरमेंट फाउंडेशनच्या (जीईईएफ) वतीने महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांचा विद्युत क्षेत्रात मानव संसाधनातील कामगिरीसाठी 'ग्लोबल एचआर लीडर ऑफ द इयर-२०२६' पुरस्काराने गौरव करण्यात आला.

'जीईईएफ'च्या वतीने शुक्रवारी (दि. २२) नवी दिल्ली येथे 'जागतिक ऊर्जा नेतृत्व परिषद-२०२६' चे आयोजन करण्यात आले. या परिषदेत स्वच्छ आणि हरित ऊर्जा तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी विविध तज्ज्ञ सहभागी झाले होते व प्रामुख्याने विकसित भारत आणि ऊर्जा सुरक्षितता यावर विचारमंथन झाले. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या मार्गदर्शनात संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनी ८६ हजार कर्मचारी आणि सव्वा तीन कोटी वीजग्राहकांना केंद्रस्थानी ठेवून विद्युत सुरक्षिततेचे उपक्रम व त्यासाठी जागतिक विक्रमी लोकसहभाग, कर्मचारी कल्याण व प्रोत्साहनपर धोरण, कर्मचारी संघटना संवाद-उपक्रम, आधुनिक कौशल्य विकास प्रशिक्षण, मानव संसाधनामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, महिला कर्मचारी सन्मान व सक्षमीकरण, कर्मचाऱ्यांना हरित ऊर्जेसाठी प्रोत्साहन यासारखे कर्मचारी-हितैषी अनेक उपक्रम राबविले.

व्यवस्थापनाच्या मंजुरीने धोरणात्मक निर्णय अंमलात आणले.

या कामगिरीचे मूल्यमापन करून 'जीईईएफ'च्या निवड समितीकडून जागतिक परिषदेत पुरस्कार जाहीर करण्यात आला. यात विद्युत क्षेत्रातील मनुष्यबळ विकासाच्या योगदानासाठी महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांचा 'ग्लोबल एचआर लीडर ऑफ द इयर-२०२६' पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

भारतातील रशियन फेडरेशनचे उपायुक्त डॉ. एव्हगेनी ग्रिव्हा, आइसलँडचे राजदूत श्री. बेनेडिक्ट होस्कुल्डसन आणि नीती आयोगाचे माजी सदस्य डॉ. विजयकुमार सारस्वत यांच्याहस्ते श्री. पवार यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजीचा निकाल शंभर टक्के

*फॅशन डिझाईनच्या विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी; प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्याकडून कौतुक*

**पुणे (दै. संध्या) :**


वेनेशा रितेश वधान
प्रथम क्रमांक


आस्था दीपक पटेल
द्वितीय क्रमांक


शावनी धनंजय फडतरे
तृतीय क्रमांक

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन संचालित सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजीचा (एसआयएफटी) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील बी.एस्सी. फॅशन डिझाईन प्रथम सत्र परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या या परीक्षेत विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. वेनेशा रितेश वधान (९.७३ एसजीपीए), आस्था दीपक पटेल (९.६४ एसजीपीए), तर शावनी धनंजय फडतरे (९.४५ एसजीपीए) यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला.

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया आणि उपाध्यक्षा सुषमा चोरडिया यांनी सर्व यशस्वी विद्यार्थिनी, पालक आणि प्राध्यापकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांची मेहनत, सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि उद्योगाभिमुख शिक्षणपद्धतीमुळे हे यश मिळाल्याचे त्यांनी सांगितले. प्रा. डॉ. संजय चोरडिया म्हणाले, "सूर्यदत्तमध्ये सर्जनशीलतेसोबत शैक्षणिक गुणवत्ता विकसित करण्यावर भर दिला जातो. विद्यार्थ्यांची ही कामगिरी त्यांच्या मेहनतीसह प्राध्यापकांच्या समर्पित कार्याची पावती आहे. भविष्यात हे विद्यार्थी जागतिक फॅशन क्षेत्रात यशस्वी व्यावसायिक आणि उद्योजक म्हणून पुढे येतील, असा विश्वास आहे."

संस्थेच्या सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलाखा यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. 'एसआयएफटी'च्या प्राचार्या डॉ. सायली पांडे यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल समाधान व्यक्त करताना संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण, नवोपक्रम आणि सर्वांगीण विकासाच्या ध्येयधोरणामुळे सातत्याने यश मिळत असल्याचे सांगितले.

'एसआयएफटी'च्या स्थापना २०१० मध्ये झाली असून, आतापर्यंत १२०० हून अधिक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. फॅशन डिझाईन, रिटेल व्यवस्थापन, फ्रीलान्सिंग, ॲक्सेसरीज डिझाईन आणि उद्योजकता या क्षेत्रांत अनेक विद्यार्थी यशस्वीपणे कार्यरत आहेत. याशिवाय, 'आयआयआरएफ बेस्ट डिझाईन कॉलेज सर्व्हे २०२४'मध्ये सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइनला देशात १५ वा आणि राज्यात तिसरा क्रमांक मिळाला आहे.

संस्थेत अद्ययावत अभ्यासक्रम, प्रात्यक्षिक शिक्षण, कार्यशाळा, संशोधनाधारित प्रकल्प आणि उद्योगतज्ज्ञांशी संवाद यांद्वारे विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते. 'ला क्लासे' या वार्षिक फॅशन शोद्वारे विद्यार्थ्यांना स्वतःच्या संकल्पना आणि डिझाइन सादर करण्याची संधी दिली जाते.

# चंदन चोरी करणाऱ्या ७ गुन्हेगारांवर मोक्का कायद्यान्वये कारवाई

**लोणी काळभोर (दै. संध्या) :**



लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चंदन चोरी करणाऱ्या ७ अट्टल गुन्हेगारांवर लोणी काळभोर पोलीसांनी मोक्का कायद्यान्वये कारवाई केली आहे. याप्रकरणी रमेश बाबु करडे (वय ५२, रा. केडगांव, ता. दौंड, जि. पुणे), शाम तानाजी साळुंके, वय २९) संतोष आण्णा शिवरकर, वय ३०, दोघे रा. केडगांव बोरी पार्धी, ता. दौंड, जि. पुणे), विशाल अनिल दामोदरे, वय २६, रा. वरवंड, ता. दौंड, जि. पुणे), फिरोज कचरु सय्यद (वय २९, रा. कासुर्डी, ता. दौंड, जि. पुणे) व पिंन्दु ऊर्फ लक्ष्मण भिमा गायकवाड (वय ३०, रा.मु. पो. निमोना, ता. शिरुर, जि.पुणे) यांना अटक करण्यात आली असुन अमोल जाधव (रा. वाळवणे, ता. पारनेर, जि. पुणे) हा अद्याप फरार आहे.

लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी दिलेल्या माहितीनुसार दिनांक २८ फेब्रुवारी रोजी पहाटे ४.१५ वाजण्याच्या सुमारांस पुनावाला स्टड फार्म, थेऊर, ता. हवेली येथे अनोळखी ७ चोरटयांनी सुरक्षारक्षक कुंदन शर्मा, सरजित सिंग व इंद्रजीत गुप्ता यांना धारधार शस्त्राचा धाक दाखवुन, जिवे ठार मारण्याची धमकी देऊन रक्कम रुपये ८० हजार रुपये किंमतीची ४ चंदनाची झाडे तोडुन त्यांचे ओंडके जबरदस्तीने चोरी करुन घेऊन गेले.

याबाबत दिलेले तक्रारी वरुन लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद होता.

सदर गुन्ह्याचे तपासात यातील मुख्य टोळीप्रमुख रमेश करडे याने यातील इतर आरोपींसह गुन्हेगारी टोळी करुन वारंवार गुन्हे करत असल्याचे निष्पन्न झाल्याने पोलीस आयुक्त पुणे शहर यांच्या सुचनेप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी आरोपींविरुध्द सदर गुन्ह्यात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोक्का) अन्वये कलमांचा अंतर्भाव करणेबाबत अप्पर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशीक विभाग, पुणे शहर यांना प्रस्ताव सादर केला होता.

दिनांक २१ मे रोजी अप्पर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशीक विभाग, पुणे शहर यांनी सदर गुन्ह्यात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोका) अन्वये कलमांचा अतर्भाव करण्यास मान्यता दिल्याने सदर गुन्ह्यात मोका कलमांचा अंतर्भाव करण्यात आला असुन गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस आयुक्त लोणी काळभोर विभाग, पुणे शहर यांचेकडे वर्ग करण्यात आला आहे.


## पुणे महानगरपालिका, पुणे

निविदा प्रक्रिया कक्ष - पाणीपुरवठा विभाग
निविदा जाहिरात - नविन कामे

विक्री कालावधी दिनांक : दि. २३/०५/२०२६ ०९:०० सकाळी ते ०६/०६/२०२६ ०२:३० दुपारी पर्यंत
स्विकृती दिनांक : दि. २३/०५/२०२६ ०९:०० सकाळी ते ०६/०६/२०२६ ०२:३० दुपारी पर्यंत
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : ०८/०६/२०२६ ०३:०० दुपारी

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रू. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/WATER_ SUPPLY/2026/06 | पाणीपुरवठा | कात्रज चौकामधील राजीव गांधी पंपिंग स्टेशन शेजारी टँकर भरणा केंद्राची उभारणी करणे करिता जलवाहिनी टाकणे व स्थापत्य विषयक कामे करणे. | रू. ६०७९/- | रू. १४२०५५२४/- | रू. १४२०५५/- | १२ | दीपक रामचंद्र रोमन ९७८०५९७४६८ |

अ) सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
ब) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाइन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्व जबाबदारी टेंडरदाराची राहील.
क) ऑनलाइन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती पाणीपुरवठा विभाग पुणे म.न.पा. येथे मिळेल.
ड) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)/३२, दि.२२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS/RTGS/NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

सही/-
Nitin Khude (Prabhari)
कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा)
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्रमांक : २/१४४ दि. २२/०५/२०२६



## जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः गांव बेल्हे व परिसरातील आसपासचे लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की,

आमचे आशिल राजश्री मोहन औटी मुळ रा. बेल्हे, ता. जुन्नर, जि. पुणे यांना गांव बेल्हे, ता. जुन्नर, जि. पुणे येथिल जमिन गट नं. ६/१/अ/१ पैकी राहुल रामदास गुंजाळ रा. बेल्हे, ता. जुन्नर, जि. पुणे यांचे हिश्श्याचे क्षेत्र ०० हे ३४.५० ख. ०.०२.२५ आकार ००.५१ पैसे ही मिळकत खरेदी घेण्याचे निश्चीत केलेले आहे. सदरचे खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचाही हक्क हितसंबंध, ताबा, गहाण, साठेखत, बक्षीसपत्र, करार-मदार अथवा अन्य इतर कोणताही हस्तांतरणाचा व्यवहार असलेस आमचे आशिलांची समक्ष भेट घेऊन कागदपत्रांसह खात्री पटवून दयावी. त्यानंतर कोणाचीही हरकत चालणार नाही. कोणाची ही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसवणुक होऊ नये म्हणुन सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

दि. २१/०५/२०२६

येणेप्रमाणे जाहीर नोटीस
राजश्री मोहन औटी तर्फे
ॲड. आर.एस. कांडेकर
आळेफाटा, ता. जुन्नर, जि. पुणे.
9372417743



## जाहीर नोटीस

क्र.हनो/कावि/११२४/२०२६

श्री. बाळासाहेब सिरसट तहसिलदार जुन्नर (पुणे) यांचे न्यायालयात

१) श्री. ज्ञानेश्वर गजानन कुलकर्णी,
रा. पिंपरी पेंढार, ता. जुन्नर, जि. पुणे. **अर्जदार**

**विरुध्द**

१) मालती लक्ष्मण देशपांडे,
२) सुंदराबाई विश्वनाथ कुलकर्णी,
सर्वे रा. पिंपरी पेंढार, ता. जुन्नर, जि. पुणे **जाबदेणार**

**दाव्यातील जमीनीचा तपशील**

| गावाचे नाव | गट क्रमांक | क्षेत्र (हे.आर) | खराबा (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|
| पिंपरी पेंढार | १७१ | ०.७१ | ०.०१ | ४.१६ |
| | १५५ | ०.२३ | ०.०२ | ०.६५ |

उपरोक्त नमुद केलेल्या जमीनी संदर्भात प्रस्तुत दाव्यामध्ये या कार्यालयात **दिनांक २५/०५/२०२६** रोजी तारीख नेमण्यात आली आहे. तेव्हा सदर तारखेस आपण **सकाळी ११.००** वाजता **तहसिलदार कार्यालय जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे** येथे वेळेवर हजर रहावे. वरील नेमलेल्या तारखेस चौकशीसाठी पुराव्याचे कागदपत्रासह आपण स्वतः अगर आपले कायदेशीर प्रतिनिधी मार्फत न चुकता हजर रहावे.

जर नेमलेल्या तारखेस/वेळी/ठिकाणी आपण वा आपले प्रतिनिधी दाव्याचे चौकशी कामी हजर राहीला नाही. तर दाव्याचे कामी आपले काही म्हणणे नाही असे गृहीत धरुन दाव्याच्या चौकशीचे कामकाज पुढे चालविण्यात येऊन पुढील निर्णय घेण्यात येईल व मागाहून तक्रार अगर म्हणणे ऐकुण घेतले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी

सही/-
(बाळासाहेब सिरसट)
तहसिलदार जुन्नर (पुणे)



## जाहीर नोटीस

क्र.हनो/कावि/११२३/२०२६

श्री. बाळासाहेब सिरसट तहसिलदार जुन्नर (पुणे) यांचे न्यायालयात

१) श्री. श्रीकृष्ण विश्वनाथ कुलकर्णी,
रा. गजेंद्र अपार्टमेंट, चिंचवड, गाव पुणे. **अर्जदार**
२) गजेंद्र श्रीकृष्ण कुलकर्णी,
रा. अमोल अवेन्यु, श्रीनाथ कॉलनी, रासने नगर,
सावेडी अहिल्यानगर ४१४००३.

**विरुध्द**

१) मालती लक्ष्मण देशपांडे,
२) सुंदराबाई विश्वनाथ कुलकर्णी, सर्वे
रा. पिंपरी पेंढार, ता. जुन्नर, जि. पुणे **जाबदेणार**

**दाव्यातील जमीनीचा तपशील**


| गावाचे नाव | गट क्रमांक | क्षेत्र (हे.आर) | खराबा (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|
| पिंपरी पेंढार | १०९२ | ०.७५ | ०.०३ | १०४४ |
| | १०९४ | ०.३१ | ०.०० | ०.५८ |
| | १०९५ | ०.४५ | ०.०२ | ०.८६ |

उपरोक्त नमुद केलेल्या जमीनी संदर्भात प्रस्तुत दाव्यामध्ये या कार्यालयात **दिनांक २५/०५/२०२६** रोजी तारीख नेमण्यात आली आहे. तेव्हा सदर तारखेस आपण **सकाळी ११.००** वाजता **तहसिलदार कार्यालय जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे** येथे वेळेवर हजर रहावे. वरील नेमलेल्या तारखेस चौकशीसाठी पुराव्याचे कागदपत्रासह आपण स्वतः अगर आपले कायदेशीर प्रतिनिधी मार्फत न चुकता हजर रहावे.

जर नेमलेल्या तारखेस/वेळी/ठिकाणी आपण वा आपले प्रतिनिधी दाव्याचे चौकशी कामी हजर राहीला नाही. तर दाव्याचे कामी आपले काही म्हणणे नाही असे गृहीत धरुन दाव्याच्या चौकशीचे कामकाज पुढे चालविण्यात येऊन पुढील निर्णय घेण्यात येईल व मागाहून तक्रार अगर म्हणणे ऐकुण घेतले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी

सही/-
(बाळासाहेब सिरसट)
तहसिलदार जुन्नर (पुणे)


## थोडक्यात पण महत्वाचे...



### मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

पिंपरी (दैनिक संध्या) : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र विधानपरिषदेच्या १६ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या द्विवार्षिक निवडणूक-२०२६ चा कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून पुणे जिल्हा स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी नामनिर्देशन पत्रे स्वीकारण्याची प्रक्रिया दि.२५ मे २०२६ पासून सुरू होणार आहे. पुणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे या निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत. या निवडणुकीसाठी मतदान दि.१८ जून २०२६ रोजी होणार असून मतमोजणी दि.२२ जून २०२६ रोजी करण्यात येणार आहे. या निवडणुकीसाठी पुणे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे सदस्य मतदार असणार आहेत. संबंधित सदस्यांची प्रारूप मतदार यादी दि. २१ मे २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून ती कार्यालयीन वेळेत खालील ठिकाणी पाहण्यासाठी उपलब्ध राहणार आहे. पुणे जिल्ह्यातील सर्व नगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींची कार्यालये दि.२१ ते २७ मे २०२६ या कालावधीत प्रारूप मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी फॉर्म क्रमांक १७, नाव वगळण्यासाठी फॉर्म क्रमांक ७ तसेच नावातील तपशील दुरुस्तीसाठी फॉर्म क्रमांक ८ भरून मतदार नोंदणी अधिकारी किंवा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, महाराष्ट्र विधानपरिषद निवडणूक-२०२६ (पुणे मतदारसंघ) यांच्याकडे सादर करता येणार आहेत. संबंधित कार्यालयाचा पत्ता जिल्हाधिकारी कार्यालय, पाचवा मजला, पुणे – ४११००१ असा असल्याचे मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी कळविले आहे.

### कुत्र्यांना खाऊ घालण्यावरून चिखलीत महिलेला मारहाण; दाम्पत्याला अटक



पिंपरी (दैनिक संध्या) : चिखली परिसरात भटक्या कुत्र्यांना खाऊ घालण्याच्या कारणावरून एका महिलेला लोखंडी रॉडने मारहाण झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी चिखली पोलिसांनी दाम्पत्याविरोधात गुन्हा दाखल करून दोघांनाही अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना मंगळवारी (दि.२० मे) मध्यरात्री १२.०५ वाजण्याच्या सुमारास संतपीठ रोड, पाटीलनगर, चिखली येथे घडली. महिला फिर्यादी या परिसरात भटक्या कुत्र्यांना बिस्कीट आणि चिकन-राईस खाऊ घालत होत्या. त्यावेळी परिसरात राहणाऱ्या जयश्री भोसले (वय ३५) आणि त्यांचे पती रामदास भोसले यांनी "येथे कुत्र्यांना काही खायला टाकू नको" असे म्हणत फिर्यादीसोबत वाद घातला. वाद वाढल्यानंतर रामदास भोसले यांनी फिर्यादीच्या हातातील लोखंडी रॉड हिसकावून घेत त्यांच्या हातावर आणि पायावर मारहाण केल्याचा आरोप आहे. तसेच जयश्री भोसले यांनीही फिर्यादीला हाताने मारहाण करत शिवीगाळ केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी चिखली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार पेटकर करत आहेत.

### पीसीसीओई येथे सार्वत्रिक मानवी मूल्य विषयावर प्रशिक्षण संपन्न


पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे 'सार्वत्रिक मानवी मूल्ये' या विषयावर तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न झाली. एआयसीटीईच्या मान्यतेने व्यवस्थापन विकास प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या प्रशिक्षणात पीसीईटी संस्था आणि ११० महाविद्यालयांमधील प्रशासकीय अधिकाऱ्यांनी व प्रतिनिधींनी नोंदणी केली होती. पीसीसीओई यूएचव्ही नोडल केंद्र प्रमुख पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. राजेश्वरी कन्नन आणि एसपीपीयूचे शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. प्रमोद पाटील, पीसीसीओईचे सर्व विभागप्रमुख, अधिष्ठाता, सहयोगी अधिष्ठाता आदी उपस्थित होते. या प्रशिक्षणामध्ये आत्म-शोध, नातेसंबंधांमधील सुसंवाद, नैतिक आचरण आणि संस्थात्मक पद्धतींमध्ये वैश्विक मानवी मूल्यांचे एकत्रीकरण या विषयावर उपस्थित सहभागींनी मत व्यक्त केले. तिसऱ्या दिवशी पॅनल चर्चा झाली. या पॅनेल मध्ये पीसीसीओईचे उप संचालक डॉ. नीळकंठ चोपडे, डॉ. राजेश्वरी कन्नन, डॉ. शीतल भंडारी, डॉ. लीना शर्मा, डॉ. संदीप पाटील आणि डॉ. राजेश फुरसुळे यांचा समावेश होता. ज्यांनी अभ्यासक्रम एकीकरण, प्राध्यापक प्रशिक्षण आणि मूल्य आधारित संस्थात्मक परिसंस्था मजबूत करण्यावर चर्चा केली. डॉ. उमेश जाधव यांच्या नेतृत्वाखाली व डॉ. अनिता माने, डॉ. विनय चिद्री यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या सत्रात किरण नाफडे यांनी निरीक्षक म्हणून काम पाहिले.

# वाल्हेकरवाडीत कचऱ्याचे साम्राज्य

## आरोग्य निरीक्षकांच्या बदलीसाठी नगरसेविका पल्लवी वाल्हेकर आक्रमक

पिंपरी (दै. संध्या)

■ आरोग्य निरीक्षक रुपाली साळवे यांच्या बदलीची मागणी



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या 'ब' क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या वाल्हेकरवाडी परिसरात कचरा उचलणे आणि साफसफाईच्या प्रश्नाने पुन्हा एकदा रौद्ररूप धारण केले आहे. परिसरात नियमितपणे कचरा उचलला जात नसल्याने आणि स्वच्छतेची कामे रखडल्याने नागरिकांना तीव्र दुर्गंधीचा व त्रासाचा सामना करावा लागत आहे. या वाढत्या अस्वच्छतेमुळे परिसरात साथीच्या आजारांचा धोका निर्माण झाला असून, नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

नागरिकांच्या या वाढत्या संतापाची दखल घेत स्थानिक नगरसेविका सौ. पल्लवी सुधीर वाल्हेकर यांनी थेट प्रशासनाविरोधात आक्रमक पवित्रा घेतला असून, संबंधित आरोग्य निरीक्षकांच्या बदलीची मागणी केली आहे.

नगरसेविका पल्लवीताई वाल्हेकर यांनी या गंभीर समस्येबाबत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या 'ब' क्षेत्रीय कार्यालयाकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. आपल्या अर्जामध्ये त्यांनी प्रशासकीय अनास्थेवर तीव्र बोट ठेवले आहे.

"वाल्हेकरवाडीतील कचरा व्यवस्थापन सुरळीत करण्यासाठी मी स्वतः वारंवार संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधला आहे. मात्र, प्रत्येक वेळी कचरा उचलण्याऐवजी वेगवेगळी कारणे देऊन प्रशासनाकडून हा प्रश्न टाळला जात आहे," असा थेट आरोप पल्लवी वाल्हेकर यांनी केला आहे.

या भागाच्या आरोग्य निरीक्षक रुपाली साळवे यांच्या कामकाजावर नगरसेविका पल्लवी वाल्हेकर यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. "आरोग्य निरीक्षकांच्या निष्क्रियतेमुळे आणि कर्तव्यात कसूर केल्यामुळेच आज वाल्हेकरवाडीत अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले असून नागरिकांमध्ये संतापाची भावना आहे. त्यांना वारंवार सूचना आणि तोंडी-लेखी तक्रारी देऊनही परिस्थितीत कोणतीही सुधारणा झालेली नाही," असे वाल्हेकर यांनी पत्रात नमूद केले आहे. साळवे यांच्या ढिसाळ कारभारामुळेच नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याने, आरोग्य निरीक्षक रुपाली साळवे यांची वाल्हेकरवाडी परिसरातून तातडीने बदली करण्यात यावी, अशी कडक मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

### पालिकेच्या 'थंड' भूमिकेमुळे नागरिकांमध्ये संताप

दुसरीकडे, वाल्हेकरवाडीतील स्थानिक नागरिकांनीही प्रशासनाच्या या धीम्या कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. लोकप्रतिनिधींनी लेखी अर्ज देऊनही महानगरपालिका प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. केवळ कागदी घोडे नाचवण्यापेक्षा पालिकेने प्रत्यक्ष जमिनीवर उतरून स्वच्छतेचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी मागणी रहिवाशांनी केली आहे. आता यावर पालिका आयुक्त आणि संबंधित वरिष्ठ अधिकारी काय पावले उचलतात, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

## महापालिकेचं थेरगाव हॉस्पिटल समस्यांच्या गर्तेत

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या थेरगाव येथील रुग्णालयाला विविध समस्यांनी अक्षरशः ग्रासले असून, उपचारासाठी येणारे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. पार्किंगची अपुरी व्यवस्था, वारंवार होणारी पाणी टंचाई, स्वच्छतागृहांची दुरवस्था तसेच कॅन्टीन सुविधेचा अभाव यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. महापालिकेच्या थेरगाव रुग्णालयात सुमारे 340 बेडची सुविधा असून दररोज 1200 हून अधिक रुग्ण ओपीडीसाठी येतात. मात्र, एवढ्या मोठ्या प्रमाणात रुग्ण येत असतानाही रुग्णालय परिसरात पुरेशी पार्किंग व्यवस्था नसल्याने वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. याशिवाय रुग्णालयातील पाण्याच्या पाइपलाईनची वारंवार गळती होत असल्याने अनेक ठिकाणी पाणी साचत असून स्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनला आहे. स्वच्छतागृहांची देखील दयनीय अवस्था झाल्याचे दिसून आले आहे. रुग्ण आणि नातेवाईकांकडून स्वच्छतेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. रुग्णालयात कॅन्टीन सुविधा उपलब्ध नसल्याने रुग्णांच्या नातेवाईकांना खाण्या-पिण्यासाठी बाहेर धावपळ करावी लागत आहे. विशेषतः लांबून येणाऱ्या नागरिकांना याचा मोठा फटका बसत आहे.

## 'स्वच्छतेत अव्वल'साठी नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा - डॉ. विजय सूर्यवंशी

### स्वच्छ आणि सुंदर पिंपरी चिंचवडसाठी सामूहिक सहभागाची गरज

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी चिंचवड शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि देशातील आदर्श शहर म्हणून ओळख निर्माण करण्यासाठी नागरिकांच्या सक्रिय सहभागाची आवश्यकता असल्याचे मत डॉ. विजय सूर्यवंशी यांनी व्यक्त केले.

स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ अंतर्गत नागरिकांकडून मिळणारा अभिप्राय हा शहराच्या स्वच्छता व्यवस्थेचे मूल्यमापन करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने स्वतःहून पुढाकार घेत आपला अभिप्राय नोंदवून शहराला देशात मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

स्वच्छ आणि सुंदर शहर घडविणे, ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. स्वच्छ सर्वेक्षणात नागरिकांनी दिलेला अभिप्राय शहराच्या कामगिरीचे प्रतिबिंब ठरतो. त्यामुळे प्रत्येकाने सकारात्मक सहभाग नोंदवून पिंपरी चिंचवडला देशातील स्वच्छ शहरांच्या अग्रक्रमावर नेण्यासाठी योगदान द्यावे, असे अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी सांगितले. उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल म्हणाले की, नागरिकांचा सहभाग आणि सहकार्य हे स्वच्छता अभियानाच्या यशाचे मुख्य बळ आहे. नागरिकांनी अभिप्राय नोंदविताना शहरातील स्वच्छतेबाबतच्या उपक्रमांना प्रोत्साहन द्यावे. प्रत्येक अभिप्राय प्रशासनाला अधिक प्रभावी नियोजन करण्यास मदत करणार असून, स्वच्छ आणि सुंदर शहर घडविण्याच्या प्रयत्नांना गती मिळेल त्याचबरोबर, शहराच्या स्वच्छता अभियानात प्रशासन आणि नागरिक यांच्यातील समन्वय महत्त्वाचा असून, प्रत्येकाने जबाबदारीची जाणीव ठेवून सहभाग नोंदवणे आवश्यक आहे.

अभिप्राय नोंदविण्यासाठी नागरिकांनी https://cf.sbmurban.org या संकेतस्थळाला भेट देऊन विचारण्यात आलेल्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## नागरिकांच्या सहभागातून जनगणनेला मिळणार गती

### पिंपरी चिंचवड शहराच्या विकासासाठी माहिती ठरणार महत्त्वाची




पिंपरी (दै. संध्या)

जनगणना २०२७ अंतर्गत घरयादी व घरगणनेच्या पहिल्या टप्प्याची सुरुवात पिंपरी चिंचवड शहरात १६ मे २०२६ पासून सुरू झाली असून, ही प्रक्रिया १४ जून २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. या मोहिमेदरम्यान नियुक्त प्रगणक नागरिकांच्या घरी भेट देऊन आवश्यक माहिती संकलित करत आहेत. तरी नागरिकांनी प्रगणकांना योग्य व संपूर्ण माहिती देऊन सहकार्य करावे, तसेच स्व-नोंदणी केलेल्या नागरिकांनी आपला स्वयं नोंदणी क्रमांक उपलब्ध करून द्यावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे.

घरयादी व घरगणना ही जनगणनेतील अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून, यामध्ये घरांची स्थिती, कुटुंबातील सदस्यांची माहिती आणि उपलब्ध नागरी सुविधांची नोंद केली जाते. या माहितीच्या आधारे शासन विविध विकासकामांचे नियोजन, सुविधा वितरण तसेच सामाजिक कल्याण योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करते त्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आणि अचूक माहितीमुळे भविष्यातील शहर विकासाला दिशा मिळणार असल्याचे उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी सांगितले.

> जनगणना ही केवळ लोकसंख्येची नोंद नसून, शहराच्या भविष्यातील गरजा ओळखण्याचे प्रभावी माध्यम आहे. नागरिकांनी दिलेली अचूक माहिती ही विकास योजनांच्या योग्य अंमलबजावणीसाठी अत्यंत उपयुक्त ठरते. त्यामुळे प्रत्येकाने सकारात्मक सहभाग घेऊन जनगणना प्रक्रिया यशस्वी करावी.
>
> — **डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
>
> घरयादी व घरगणना मोहिमेदरम्यान नागरिकांनी प्रगणकांना आवश्यक माहिती वेळेत उपलब्ध करून द्यावी. जनगणनेसाठी दिलेली माहिती पूर्णपणे सुरक्षित ठेवली जाते. नागरिकांच्या सहकार्यामुळेच अचूक माहिती संकलित होऊन शहराच्या सर्वांगीण विकासाला गती मिळणार आहे.
>
> — **सचिन पवार, उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

## "सत्तेसाठी नाही, सेवेसाठी.. 'शिवशाही शासन' या नव्या राजकीय पक्षाची स्थापना"

पिंपरी (दै. संध्या)



"सत्तेसाठी नाही, तर सर्वसामान्यांच्या सेवेसाठी" हे ब्रीदवाक्य घेऊन लोकसेवक युवराज दाखले यांनी "शिवशाही शासन" या नव्या राजकीय पक्षाची अधिकृत घोषणा केली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या रयतेच्या राज्याची प्रेरणा आणि आद्यक्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या समतेच्या विचारातून हा पक्ष उभा राहत असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबई येथे झालेल्या घोषणेत युवराज दाखले म्हणाले की, गेल्या अनेक वर्षांपासून प्रस्थापित पक्षांनी गरीब, कष्टकरी, शेतकरी, कामगार, मातंग, बहुजन समाज, तृतीयपंथी भगिनी आणि व्यापारी वर्गाचा केवळ मतांसाठी वापर केला. शिक्षणाचे वाढते बाजारीकरण, बेरोजगारी आणि मूलभूत सुविधांचा अभाव यामुळे महाराष्ट्रातील सामान्य नागरिक त्रस्त झाला असून, वंचित समाजाला सत्तेत योग्य प्रतिनिधित्व मिळवून देण्यासाठी "शिवशाही शासन" पक्ष मैदानात उतरला आहे. पक्षाने आपली ५ सूत्री भूमिका जाहीर केली असून त्यामध्ये शिक्षण, रोजगार, स्वच्छता व आरोग्य, शेतकरी-कामगार-व्यापारी हित आणि वंचित समाजाच्या स्वाभिमानाला प्राधान्य देण्यात आले आहे. खासगी क्लासेसच्या लुटीला आळा घालणे, सरकारी शाळा सक्षम करणे, SC/ST/OBC/NT/VJNT विद्यार्थ्यांना मोफत उच्च शिक्षण, प्रत्येक घरात रोजगार, तृतीयपंथी, विधवा व दिव्यांगांसाठी विशेष योजना, तसेच "नालामुक्त-रोगमुक्त महाराष्ट्र" अभियान राबविण्याची घोषणा करण्यात आली.

# 'एलपीजी विरहित शहर' संकल्पनेसाठी नागरिक, गृहनिर्माण संस्था आणि एमएनजीएलने संयुक्तपणे पुढाकार घेण्याचे आयुक्तांचे आवाहन

पिंपरी (दै. संध्या)

■ घरगुती पाईप गॅस वापर वाढीसाठी महापालिका, एमएनजीएल आणि गृहनिर्माण संस्थांची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न



पिंपरी चिंचवड शहराला पर्यावरणपूरक, सुरक्षित आणि आधुनिक इंधन व्यवस्थेकडे नेण्याचा महानगरपालिकेचा निर्धार आहे. देशातील अनेक शहरांमध्ये घरगुती पाईप गॅस प्रणालीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून त्याच धर्तीवर पिंपरी चिंचवडमधील प्रत्येक गृहनिर्माण सोसायटीमध्ये पाईप गॅसचा वापर वाढविण्यासाठी नियोजनबद्ध मोहीम राबविणे गरजेचे आहे. त्यासाठी भविष्यात पिंपरी चिंचवडला देशातील पहिले 'एलपीजी विरहित शहर' बनविण्यासाठी गृहनिर्माण संस्था, महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड तसेच नागरिकांनी संयुक्तपणे पुढाकार घेण्याचे आवाहन आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात घरगुती पाईप गॅसचा वापर वाढविणे, एलपीजी गॅसवरील अवलंबित्व कमी करणे तसेच नागरिकांमध्ये सुरक्षित आणि पर्यावरणपूरक इंधनाविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड (एमएनजीएल), गृहनिर्माण संस्थांचे प्रतिनिधी तसेच सहकार विभागाचे उपनिबंधक यांच्या संयुक्त बैठकीचे आयोजन चिंचवड येथील ऑटो क्लस्टर सभागृहात करण्यात आले होते. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी होते, त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, उप आयुक्त अण्णा बोदडे, उपनिबंधक कार्यालयाचे सहाय्यक सहकार अधिकारी शशिकांत श्रृंगारे, बाळासाहेब घुगे यांच्यासह महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक शंकर कुमार, स्वतंत्र संचालिका भाग्यश्री मंथळकर, संचालक शंकर करजागी, महाव्यवस्थापक रितेश इंगोले, अमोल हाथी, वरिष्ठ संचालक, वासुदेव गुरसाळी, प्रशांत खंदाडे, उपव्यवस्थापक अमोल वैद्य, सुनील पाटील, परम गोरे, संतोष बेना, व्यवस्थापन प्रशिक्षणार्थी प्रणव बी, तसेच विविध गृहनिर्माण संस्थांचे सुहास पटवर्धन, सचिन लोंढे, सचिन पाटील, संदीप कुंभार, संजिवन सांगळे, प्रताप भामरे, अधिक दिवे, चारूहास कुलकर्णी, सागर लोखंडे, राहुल मोकाशी आदी अध्यक्ष व प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केंद्र शासनाने इंधन बचत आणि पर्यावरणपूरक ऊर्जेच्या वापराबाबत केलेल्या आवाहनाचा संदर्भ देत शहरात एलपीजी गॅस सिलिंडरचा वापर टप्प्याटप्प्याने कमी करून घरगुती पाईप गॅसचा वापर वाढविणे ही काळाची गरज असल्याचे स्पष्ट केले. नैसर्गिक वायू हा सुरक्षित, सातत्याने उपलब्ध होणारा आणि आधुनिक शहरी जीवनशैलीस पूरक पर्याय असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच देशातील अनेक प्रमुख शहरांमध्ये घरगुती पाईप गॅस प्रणाली यशस्वीपणे कार्यरत असून नागरिकांचा त्यास मोठा प्रतिसाद मिळत आहे. त्याच धर्तीवर पिंपरी चिंचवड शहरातील प्रत्येक गृहनिर्माण सोसायटीमध्ये पाईप गॅसचा वापर वाढविण्यासाठी नियोजनबद्ध मोहीम राबविणे आवश्यक आहे. भविष्यात पिंपरी चिंचवड शहराला देशातील पहिले "एलपीजी विरहित शहर" बनविण्यासाठी गृहनिर्माण संस्था, महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड तसेच नागरिकांनी संयुक्तपणे पुढाकार घेऊन संकल्प करावा जेणेकरून हे ध्येय साध्य होईल, असे आवाहन देखील त्यांनी केले.

नागरिकांमध्ये पाईप गॅसबाबत विश्वास आणि जागरूकता निर्माण करण्यासाठी व्यापक जनजागृती मोहिमेची आवश्यकता असल्याचे सांगत आयुक्तांनी सोशल मिडीया मोहिमा, माहितीपत्रकांचे वितरण, प्रशिक्षण शिबिरे, प्रत्यक्ष सोसायटी भेटी तसेच घरोघरी जाऊन जनजागृती करण्याच्या सूचना दिल्या.

विशेषतः ज्या गृहनिर्माण संस्थांमध्ये एमएनजीएलचे कनेक्शन उपलब्ध असूनही नागरिकांकडून प्रत्यक्ष वापर केला जात नाही, अशा सोसायट्यांना प्राधान्याने लक्ष्य करून विशेष मोहीम राबविण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. याशिवाय, एमएनजीएलच्या वतीने समन्वय अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात यावी, जेणेकरून नागरिकांच्या शंका, तांत्रिक अडचणी आणि कनेक्शन प्रक्रियेबाबत त्वरित मार्गदर्शन करता येईल, असेही त्यांनी नमूद केले.

गृहनिर्माण संस्थांचे अध्यक्ष, सचिव आणि पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेत जास्तीत जास्त फ्लॅटधारकांना या योजनेत सहभागी करून घ्यावे, असेही आयुक्त डॉ. सूर्यवंशी यावेळी म्हणाले.

पाईप गॅस प्रणालीमुळे सिलिंडर साठवणुकीची गरज राहत नाही, गॅस पुरवठा अखंडित राहतो, वेळेची बचत होते तसेच पर्यावरणीय दृष्टीनेही हा पर्याय अधिक परिणामकारक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. शहराच्या शाश्वत आणि स्मार्ट विकासाच्या दृष्टीने पाईप गॅसचा वापर वाढविणे हा महत्वाचा टप्पा ठरणार असल्याचा विश्वासही बैठकीत व्यक्त करण्यात आला.

> बैठकीदरम्यान एमएनजीएलच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे घरगुती पाईप गॅस योजनेची सविस्तर माहिती दिली. यामध्ये गॅस पाईपलाईनची कार्यपद्धती, एमएनजीएल अँपद्वारे उपलब्ध सेवा, ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या विविध सुविधा, आर्थिक बाबी, सुरक्षिततेचे निकष तसेच घरगुती पाईप गॅसच्या वापरामुळे होणारे फायदे याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### सविंदणे येथील नंदा विठ्ठल शिंदे यांचे प्रदीर्घ आजाराने निधन

कवठे येमाई (दैनिक संध्या) : शिरूर तालुक्यातील सविंदणे येथील शिंदे मळ्यातील नंदा विठ्ठल शिंदे यांचे काल गुरुवार दिनांक २१ रोजी काल सायंकाळी प्रदीर्घ आजाराने दुःखद निधन झाले.मृत्यू समयी त्या ६४ वर्षे वयाच्या होत्या.त्यांच्या पश्चात पती विठ्ठल शिंदे,कन्या प्राजक्ता देशमुख,एक नातू असा परिवार आहे. नंदा या मागील ४ वर्षांपासून आजारी होत्या. ज्या पत्नीने आयुष्यभर विठ्ठल शिंदे यांना उत्तम साथ दिली त्या पत्नीच्या आजारपणात ही न डगमगता पती विठ्ठल शिंदे यांनी त्यांची उपचारासह सर्वोतोपरी सेवा करीत इतरांपुढे आदर्श ठेवला आहे.

### महागाईचा ताण सर्व सामान्य कुटुंबाला

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : अन्नधान्य आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमती सातत्याने वाढत आहेत. यामुळे सर्वसामान्यांचे जगणे कठीण झाले. बाजारपेठेत ग्राहक खर्च कमी झाल्यामुळे विविध उद्योगांवर परिणाम झाला आहे. इंधन दरवाढीमुळे भारतात महागाईचा भडका उडाला असून अर्थव्यवस्थेवर मंदीचे सावट आहे. भारत आपल्या तेल आणि वायूच्या गरजांचा मोठा भाग परदेशातून आयात करतो. त्यामुळे, आंतरराष्ट्रीय बाजारात तेल आणि वायूच्या किमती वाढल्यास त्याचा थेट परिणाम भारतावर होतो. शिवाय, वाढत्या वायूच्या किमतींमुळे खते आणि खतांच्या किमती वाढतील, ज्यामुळे शेतकऱ्यांचा खर्च वाढेल. शेतकऱ्यांनी खतांचा वापर कमी केल्यास, पीक उत्पादन घटू शकते. याचा थेट परिणाम अन्नधान्याच्या किमतींवर होईल. स्पष्टपणे दीर्घकाळ चाललेल्या तणावाचा थेट परिणाम भारतातील महागाईवर झाला यामुळे सर्वसामान्य लोकांच्या खिशावर ताण येतोय.



### कांद्याला हमीभाव देण्याची प्रशांत तुळवे यांची मागणी

चाकण (दैनिक संध्या) : खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केट यार्ड मध्ये कांद्याला प्रतिकिलोस सहा रुपये असा निचांकी भाव मिळत असल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. कांद्यास हमीभाव द्या, अशी मागणी शिव उद्योग सहकार सेनेचे पुणे जिल्हा अध्यक्ष प्रशांत तुळवे यांनी केली आहे. कांद्याच्या उत्पादन खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ होत असताना बाजारातील भाव अत्यंत कमी असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजीचे वातावरण पसरले आहे. उत्पादन खर्च वसूल होत नसल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. एकरी उत्पादनाला ५० हजार रुपये खर्च येतो. मात्र सध्या कांदा विकून फक्त वीस ते पंचवीस हजार रुपये मिळाले तर करायचे काय. असा सवाल कांदा उत्पादक शेतकरी उपस्थित करीत आहेत. सरकारने तातडीने हस्तक्षेप करून कांद्याला हमीभाव द्यावा. तसेच निर्यात धोरण सुलभ करावे अशी मागणी प्रशांत तुळवे यांनी केली आहे. किरकोळ बाजारात ग्राहकांना स्वस्त कांदा मिळत असला तरी कांदा उत्पादक शेतकरी मात्र आर्थिक अडचणीत सापडला आहे. शेतकऱ्यांची आर्थिक गणिते कोलमडली असून बरेच शेतकरी कांदा विक्रीसाठी बाजारात आणणे ऐवजी वखारीत साठवून ठेवत आहेत. कांद्याच्या भावातील ही घसरण कायम राहिल्यास पुढील हंगामात कांदा लागवड कमी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सरकारने योग्य वेळी निर्णय घेऊन शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देणे आवश्यक आहे.



### चाकण उद्योग नगरीतील समस्या मार्गी लावा; प्रशांत तुळवे यांची मागणी

चाकण (दैनिक संध्या) : उद्योग पंढरीचे नाक असलेल्या चाकण एमआयडीसी परिसरात खराब रस्ते, वाहतूक कोंडी, पाणी व वीज पुरवठ्याच्या समस्या, प्रदूषण आणि कामगारांसाठी अपुऱ्या सुविधा आदी गंभीर समस्यां मुळे उद्योगांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. हे नुकसान टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शिव उद्योग सहकार सेनेचे पुणे जिल्हाध्यक्ष प्रशांत तुळवे यांनी केली आहे. चाकण हे महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाचे महत्त्वाचे केंद्र आहे. उद्योग व रोजगार वाचविण्यासाठी रस्ते, ट्रॅफिक आणि मूलभूत सुविधांवर त्वरित काम होणे गरजेचे आहे. अवैध प्रवाशी वाहतूक करणाऱ्या वाहनांचा सर्वच रस्त्यावर सुळसुळाट झाला असून, प्रवासी घेण्याच्या स्पर्धेमध्ये अनेक रिक्षाचालक प्रवाशांचा जीव धोक्यात घालून या वाहतूक कोंडीत आपली वाहने दामटत असल्याचे दिसत आहे. त्यात रुग्णवाहिका ही अडकत असून काही वाहनचालक कोणत्याही सूचना न जुमानता वाहने वेडीवाकडी घुसवून वाहतूक कोंडीला निमंत्रण देत आहेत. वाहतूक कोंडीमुळे दररोज वाहनांच्या लांबच्या लांब रांगा लागल्याचे दिसून येत आहे. रांगेमध्ये बराच वेळ थांबावे लागत असल्याने वाहन चालकांना वेळेचा आणि इंधनाचा फटका बसत आहे. चाकण ते भोसरी या दरम्यान प्रत्येक चौकात वाहतूक सुरळीत करण्यासाठी ट्रॅफिक पोलीस व त्यांना मदती करता ट्रॅफिक वॉर्डनची नेमणूक केली आहे. त्यांच्याकडून वाहतूक सुरळीत करण्याचे काम सुरू आहे. बेशिस्त वाहन चालकांमुळे वाहतूक सुरळीत करताना पोलिसांवर देखील मोठा ताण येत आहे. दररोजच्या या वाहतूक कोंडीमुळे वाहनचालक व विद्यार्थी हतबल झाले आहेत. प्रशासनाने वाहतूक कोंडीवर मूलभूत सुविधांसह ठोस मार्ग काढून नागरिक व वाहनचालकांचा दररोज होत असलेला मनस्ताप वाचवावा, असे प्रशांत तुळवे यांचे म्हणणे आहे.

### उन्हामुळे बाजारात फुलांची आवक घटली; लग्नसराईमुळे मागणी वाढली

बारामती (दैनिक संध्या) : बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जळोची उपबाजारात बुधवारी (दि. 20) फुलांची आवक घटल्याचे चित्र दिसून आले. लग्नसराई, धार्मिक कार्यक्रम आणि सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर फुलांना प्रचंड मागणी आहे. परंतु, तीव उन्हाचा परिणाम फुलशेतीवर झाला असून, त्यामुळे आवक मात्र कमालीची घटली आहे. फुलांना चांगली मागणी मिळाल्याने बाजारभावात तेजी दिसून आली. विशेषतः बॉडेक्स गुलाबाला सर्वाधिक 190 रुपये दर मिळाला. परिणामी उत्पादकांनी समाधान व्यक्त केले. उमला गुलाबाची 5 किलो आवक झाली. या फुलाला 20 ते 50 रुपये दर मिळाला असून, सरासरी भाव 35 रुपये राहिला. शेवंती भाग्यश्रीची 10 किलो आवक झाली. या प्रकाराला 30 ते 100 रुपये दर मिळून सरासरी भाव 70 रुपये राहिला. दरम्यान, पर्पल शेवंतीच्या 5 पेंडी बाजारात दाखल झाल्या. या फुलाला 80 ते 120 रुपये दर मिळाला असून, सरासरी भाव 100 रुपये राहिला. त्यामुळे सजावटीच्या फुलांना ग्राहकांकडून अधिक पसंती मिळत असल्याचे चित्र बाजारात पाहायला मिळाले; मात्र, उमला/शिळी छडी, गलांडा, लिली, ग्लॅडिएटर गुलाब, बॉडेक्स तुकडा, दिवाईन गुलाब, पासली, बिजली, मोगरा, शेवंती पौर्णिमा, शेवंती सेंट व्हाईट आणि डबल शेवंती या फुलांची आवक झाली नसल्याचे बाजार समितीने स्पष्ट केले.

## टेम्पो, कार, दुचाकीच्या तिहेरी अपघातात एक ठार तर पाच जण जखमी

कवठे येमाई (दै. संध्या)

शिरूरच्या पश्चिमेकडील पाबळ जवळील कान्हूर मेसाई रस्त्यावर सोमवारी सकाळी साडे अकराच्या सुमारास टेम्पो,कार,दुचाकीच्या तिहेरी अपघातात एक ठार तर पाच जण जखमी झाल्याची घटना घडली.या भीषण अपघातात पाबळ येथील रिक्षाचालक भास्कर शिवलाल मकवाणे या ६० वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला.तर कान्हूर मेसाईच्या घोलपवाडी येथील आशा बाळू घोलप, खैरेनगरचे ४२ वर्षीय दुचाकीस्वार सतीश भाऊसाहेब खैरे,पाबळ जवळील मोटारचालक संभाजी भगवान जाधव,गणेश बबन आगरकर,काळूराम तुकाराम चौधरी अशी या अपघातातील जखमींची नावे आहेत.याप्रकरणी सुधीर सदाशिव मकवाणे यांनी शिक्रापूर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार,सोमवारी सकाळच्या सुमारास पाबळकडून येणारी कार एम एच १२ टी के ३१६९ अचानक विरुद्ध दिशेला गेल्याने समोरून येणाऱ्या रिक्षा क्रमांक एम एच १४ ई एच २६५० यांची सामोरा समोर जोरदार धडक झाली. त्याचवेळी शेजारून जाणाऱ्या दुचाकीला एम एच १२ एच एक्स ९४९६ कारची देखील धडक बसली. यामध्ये रिक्षा टेम्पो व कार च्या समोरच्या बाजूने मोठे नुकसान झाले तर रिक्षा चालकाचा मृत्यु झाला.या अपघातात महिलेसह पाच जण जखमी झाले आहेत. दुचाकीस्वार थोडक्यात बचावला आहे. पोलिसांनी मोटारचालक संभाजी भगवान जाधव याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलिस हवालदार संतोष शेळके करत आहेत.नशीब बलवत्तर म्हणून या अपघातात शिरूर तालुक्यातील खैरेनगरचे माजी उपसरपंचसतीश खैरे हे या अपघातात थोडक्यात बचावले.

## विचारमंथन मेळावा संपन्न : ओळखपत्र वितरण

कोरेगावमुळ (दै. संध्या)

देशात प्रचंड अराजकता पसरली असून सामाजिक सद्भाव लोप पावत आहे.अशा परिस्थितीत रंजल्या गांजलेल्यांना मुलभूत आणि आरोग्य सुविधेसोबत सामाजिक उपक्रमांसाठी ईतरांना प्रेरित करून सामाजिक सद्भाव वाढवणे गरजेचे आहे. मदत कार्यातून मानवतावादी कर्तव्यासाठी पत्रकरांनी पुढे येणे आवश्यक आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि कर्मयोगी संत गाडगे बाबांच्या संकेतानुसार अशा प्रकारचे कार्य लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघकरीत आहे. म्हणून मोलाचे कार्य करणारी ही संघटना सशक्त करण्यासाठी पत्रकारांनी योगदान द्यावे असे आवाहन दादर येथील विदर्भ वैभव मंदिर ट्रस्टचे व बि.ई एस.टी कामगार संघटनेचे सरचिटणीस गजानन नागे यांनी केले.राजेंद्र आंगणे व कमलेश कुबल यांनी सर्वांच्या उपस्थितीत अध्यक्ष संजय देशमुख



यांना झालेल्या वाढदिवसाचे अभिष्टचिंतन करून त्यांच्या स्वास्थ आणि यशस्वी वाटचालीसाठी प्रेमपूर्वक शुभेच्छा व्यक्त केल्या. लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाचा मुंबई व कोकण विभागाचा १३ व्या मासिक विचारमंथन मेळावा विदर्भ वैभव मंदिर,दादर (प) मुंबई येथे संपन्न झाला. त्यावेळी ते अध्यक्षिय मनोगतातून बोलत होते. पुणे येथील विद्यापीठ हायस्कूलचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक व पत्रकार, विष्णू मोरे, लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे संस्थापक- राष्ट्रीय अध्यक्ष संजय एम.देशमुख,राष्ट्रीय पदाधिकारी पुष्पराज गावंडे यांची विचारमंचावर प्रमुख उपस्थिती होती. विष्णू मोरे यांना ओळखपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी सर्वप्रथम लोकस्वातंत्र्यच्या सामाजिक सेवेचे आधिष्ठाण राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,कर्मयोगी संत गाडगे बाबा यांना वंदन अभिवादन करण्यात आले. देशातील शहिद जवान, अत्याचारग्रस्त महिला बळी, आत्महत्त्याग्रस्त शेतकरी, दिवंगत पत्रकार, रस्ते अपघात व आपत्तीग्रस्तांना यावेळी श्रध्दांजली अरवपन करण्यात आली. संघटनेवर महाराष्ट्राभरातून व्यक्त होणारे प्रेमभाव आणि वाटचालीबाबत शासन-प्रशानाकडील अभिप्रायांबाबत बोलतांना सर्वसमावेशक हिताची दुरद्दष्टी ठेवत संघटनेप्रती निष्ठा आणि कर्तव्यभावनांनी संघटन मजुबत करण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी पुढे यावे. तसेच मुंबई आणि महाराष्ट्रातील पूर्वीची पदे रद्द करून नवी पदरचना करणार असल्याची माहिती लोकस्वातंत्र्य अध्यक्ष संजय एम.देशमुख यांनी दिली. पुष्पराज गावंडे व विष्णू मोरे (पुणे) यांनी आवाहन आणि मार्गदर्शन केले. हसत बोलत अत्यंत खेळीमेळीच्या झालेल्या कार्यक्रमास कमलेश कुबल, राजेंद्र आंगणे, सतिश अडावडे, सुहास मोरे, मंगल शिंदे, प्रभाकर तळोकार, व ईतर सभासदांची उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाचे संचलन, प्रास्ताविक,आणि आभारप्रदर्शन संज एम.देशमुख यांनी केले. अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

## प्रस्तावित उन्नत रस्ते आणि मेट्रो प्रकल्पांपूर्वी चाकणला 'बायपास' ची मागणी

*महामार्गांच्या कामानंतर होणाऱ्या वाहतूक कोंडीला सुपर पर्याय*

चाकण (दै. संध्या)

राज्य सरकारने मुंबई - पुणे महामार्गाला चाकणमार्गे एका उन्नत रस्त्याद्वारे पुणे - अहिल्यानगर महामार्गाशी जोडण्याच्या योजनेला मंजुरी दिली आहे. या पार्श्वभूमीवर चाकण नगरपरिषदेने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे अशी विनंती केली आहे की, या औद्योगिक नगरीतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी सर्वप्रथम पाच किलोमीटर लांबीचा एक बायपास रस्ता बांधण्याची गरज आहे.

प्रस्तावित विकास आराखडा आणि पुणे प्रादेशिक आराखडा यामध्ये दर्शविलेले ४५ मीटर रुंदीचे वाकी ते तळेगाव रस्ते आणि ३० मीटर रुंदीचे वाकी ते शिक्रापूर रस्ते, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे भूसंपादित करून विकसित करण्यात यावेत, अशी विनंती करण्यात आल्याचे चाकण नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ.अंकुश जाधव यांनी सांगितले. उन्नत महामार्गाचे काम सुरू होईल, तेंव्हा रस्त्यांचा हा पट्टा 'बायपास' म्हणून काम करेल. चाकण शहरातील रस्त्यांवरील वाहतूक कोंडी कमी करण्यास मोलाची मदत होईल.

**विकासाला चालना मिळणार**

> "एकूण ५३ किलोमीटर लांबीचा तळेगाव, चाकण व शिक्रापूर हा उन्नत रस्ता महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाद्वारे सुमारे ४,२०० कोटी रुपयांच्या अंदाजित खर्चातून विकसित केला जाईल. भोसरी ते चाकण या प्रस्तावित उन्नत मेट्रो प्रकल्पाची उभारणी महाराष्ट्र मेट्रो रेल महामंडळ लिमिटेडद्वारे केली जाईल."

वाहतूक कोंडी आणि नागरी सुविधांबाबत तक्रारी प्राप्त झाल्यानंतर, तत्कालीन उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांनी गेल्यावर्षी (दि.८ ऑगस्ट ) चाकणचा पाहणी दौरा केला होता. त्यानंतर पवार यांनी चाकण शहराच्या प्रस्तावित विकास आराखड्या प्रमाणे आणि पुणे प्रादेशिक आराखड्याप्रमाणे ४५ मीटर रुंदीचा वाकी ते तळेगाव रस्ता आणि ३० मीटर रुंदीचा वाकी ते शिक्रापूर रस्ता विकसित करण्याचे निर्देश दिले होते.

पीएमआरडीएने हे काम हाती घेण्यास संमती दिली होती. परंतु आता प्रशासनात बदल झाला असून, नवीन महानगर आयुक्तांनी पदभार स्वीकारला आहे. त्यामुळे, त्यांना या संदर्भात एक स्मरणपत्र पाठवण्यात आले आहे, असे डॉ. जाधव यांनी सांगितले.

नाशिक फाटा ते राजगुरुनगर उन्नत रस्ता आणि भोसरी ते चाकण अशा मेट्रो प्रकल्पांचे बांधकाम लवकरच सुरू होण्याची शक्यता आहे. ज्यामुळे चाकण मधील वाहतुकीची परिस्थिती आणखीच बिकट होण्याची भीती आहे. वाकी ते तळेगाव हा रस्ता ४५ मीटर रुंद आणि वाकी ते शिक्रापूर हा रस्ता ३० मीटर रुंद म्हणून विकसित केला गेला. तर विविध महाप्रकल्पांची अंमलबजावणी सुरू असताना या रस्त्यांचा वापर चाकण शहरासाठी पर्यायी मार्ग अर्थात बायपास म्हणून करता येईल. तसेच, अपघाती मृत्यूंची संख्या कमी करण्यातही या रस्त्यांची महत्त्वाची भूमिका रहाणार आहे.

## भीमाशंकरमधील विकासकामांवर ग्रामस्थांचा नाराजीचा सूर

भीमाशंकर (दै. संध्या)

श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे मागील 4 महिन्यांपासून सुरू असलेल्या विकास आराखड्यातील कामांवर स्थानिक ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे. नियोजनातील त्रुटी, सार्वजनिक बांधकाम विभाग व पुरातत्त्व विभागाचे दुर्लक्ष तसेच कंत्राटदाराच्या मनमानीमुळे कामे संथगतीने सुरू असून, दर्जाकडेही दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. श्रीक्षेत्र भीमाशंकर येथील सभामंडपाचे काम कमी कालावधीत पूर्ण करून त्याची गिनीज बुकमध्ये नोंद होणार असल्याचा दावा प्रशासकीय यंत्रणेकडून करण्यात आला होता. यासाठी शासन स्तरावर वारंवार बैठका घेण्यात आल्या. मात्र, संबंधित यंत्रणांच्या हलगर्जीपणामुळे ही संधी गमावल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. भाविकांना पवित्र शिवलिंगाचे दर्शन घेण्यासाठी मंदिर 31 मे रोजी खुले करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली आहे. मात्र, सध्या पायरी मार्ग आणि सभामंडपाची कामे जलदगतीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नसल्याचा आरोप होत आहे. तसेच, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुरातत्त्व विभाग आणि संबंधित ठेकेदारांकडून प्रत्यक्ष देखरेख केली जात नसल्याचेही ग्रामस्थांनी सांगितले.

ठेकेदाराचा सुपरवायझर दररोज कामांचे जिओ-टॅग फोटो काढून वरिष्ठांकडे पाठवत असून, संबंधित अधिकारी प्रत्यक्ष पाहणी न करता कामांवर लक्ष असल्याचे दाखविण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

## सहा गोवंश जनावरे ताब्यात

जुन्नर (दै. संध्या)

जुन्नर ग्रामीण रुग्णालया शेजारील झाडाझुडपांमध्ये सहा गोवंश जातीची जनावरे बेकायदेशीर कत्तलीच्या हेतूने चारा-पाण्याविना बांधून ठेवल्याची घटना नुकतीच उघडकीस आली. जुन्नर पोलिसांनी ही जनावरे ताब्यात घेऊन संगमनेर येथील गोशाळेत रवाना केली आहेत. या प्रकरणी एका व्यक्तीसह इतर अनोळखी व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संदीप पोपट टेमकर (रा. अवसरी, ता. आंबेगाव) याच्यासह इतर अनोळखी इसमांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. अंमलदार अजय इंगोले यांनी फिर्याद दिली आहे. जुन्नर ग्रामीण रुग्णालयाशेजारील झाडाझुडपांमध्ये गोवंश जातीची जनावरे अवैधरित्या बांधून ठेवल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार सहायक पोलिस निरीक्षक अरविंद गटकुळ,अंमलदार कैलास केंद्रे, शंभूदेव निरडे व संजय भोसले यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता तीन गायी व तीन गोऱ्हे



बांधलेल्या अवस्थेत आढळून आले. दोन गायींच्या कानावरील चिन्हांद्वारे माहिती घेतली असता एका गायीची नोंद संदीप टेमकर यांच्या नावावर असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर सर्व गोवंश जनावरे संगमनेर येथील गोशाळेत पाठविली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संदीप मोरे करीत आहेत. दरम्यान, शिवजन्मभूमी जुन्नरमध्ये गोवंश हत्या होऊ नये, यासाठी नगर परिषद प्रशासनाने सतर्क राहावे, अशी मागणी विविध संघटना आणि गोरक्षकांकडून करण्यात आली. या पूर्वी नगरपरिषदेला निवेदनेही दिली आहेत. भविष्यात अशा घटना घडू नयेत, यासाठी नगर परिषद प्रशासनाने दक्ष राहावे, असा इशारा नगराध्यक्षा सुजाता काजळे यांनी लेखी पत्राद्वारे दिला आहे.

## गाथा व ज्ञानेश्वरी ग्रंथाची हस्त लिखित स्वरूपात ३ वर्षात निर्मिती

*कवठे येमाईचे सेवानिवृत्त उपकार्यकारी अभियंता कोंडीराम इचके यांचा आगळावेगळा उपक्रम*

कवठे येमाई (दै. संध्या)

मनामध्ये तीव्र इच्छाशक्ती व संकल्पित कार्य जिद्दीने पूर्णत्वाकडे नेण्याचा मानस असला की ते कार्य पूर्णत्वाकडे जाते च. असाच एक प्रत्यय व अनुभव पाहावयास मिळाले तो म्हणजे शिरूर तालुक्यातील कवठे येमाईच्या इचकेवाडीत वास्तव्यस असणारे शासनाच्या जल संपदा विभागातून उपकार्यकारी अभियंता पदावरून निस्वार्थपणे सेवा करीत सेवानिवृत्त झालेले व त्यानंतर केवळ समाजसेवा,प्रभोधन व पारमार्थिक सेवेत लिन झालेले ह.भ.प. कोंडीराम तानाजी इचके यांनी मागील ३ वर्षापूर्वी ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी व संतश्रेष्ठ जगद्गुरू तुकाराम महाराज यांची गाथा हे दोन ग्रंथ स्वतःच्या हस्ताक्षरात लिखित स्वरूपात उतरविण्याचा संकल्प केला.व नुकतीच त्या दोन्ही हस्तलिखित ग्रंथांचे लिखाण पूर्ण झाले.व आज दि. २२ ला त्यानिमित्ताने इचके कुटुंबीयांनी हस्तलिखित ग्रंथांचे विधिवत पूजन,श्री सत्यनारायण



महापूजा,महाप्रसाद,जागरण गोंधळ या विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.सेवा निवृत्त झालेले कोंडीराम इचके यांनी २२ वर्षे पंढरीची पायी वारी केली. आज वयाची ६८ वर्षे सुरु असताना देखील मागील तीन वर्षांपासून येथील घोडनदी किनारी असलेल्या ऐतिहासिक श्री विठ्ठल रखुमाई मंदिरात एकांतात व अखंडपणे बसत या दोन्ही हस्तलिखित ग्रंथांची निर्मिती केली. याच बरोबर गावरान गायी अंगनी का असावी याचा सखोल अभ्यास करून याच इचके कुटुंबाने आपल्या घरा बाजूकडील गोठ्यात सुंदर अशी खिल्लार (गावठी) गाय व तिचे वासरू जीवापाड सांभाळली आहे. या कामी त्यांची पत्नी माजी पंचायत सामिती सदस्या गंगुबाई यांची मोलाची मदत व साथ लाभल्याचे कोंडीराम यांनी सांगितले. तर कोंडीराम इचके यांच्या हस्तलिखित ग्रंथ निर्मिती करण्याच्या आगळ्या वेगळ्या उपक्रमाची प्रेरणा घेत येथीलच त्यांचे मित्र डॉ. विकास शेटे व सविंदनेचे ८५ वर्षीय सेवानिवृत्त मुख्याध्यापक पी.डी. नरवडे यांनी देखील ग्रंथराज ज्ञानेश्वर हस्तलिखीत स्वरुपात निर्माण केली आहे.

ह.भ.प. कोंडीराम इचके यांनी हस्तलिखित स्वरूपात दोन ग्रंथांची निर्मिती केल्याबद्दल श्री क्षेत्र गाथा मंदिर देहूचे अध्यक्ष ह.भ.प. पांडुरंग महाराज घुले,हभप तुलसीराम महाराज सरकटे,हभप डॉ.विकासानंद मिसाळ,वैराग्यमूर्ती प्रभाकर महाराज झोलकर त्यांचे अभिनंदन करीत शुभेच्छा दिल्या आहेत.आज दि.२२ ला कवठे येमाईच्या इचकेवाडी येथील त्यांच्या वैष्णव सदन वास्तूत ग्राम काका फक्कड जोशी यांच्या हस्ते हस्तलिखित ग्रंथांचे विधिवत पूजन करण्यात आले. या आनंददायी सोहळ्यासाठी सामाजिक कार्यकर्ते आप्पासाहेब नरवडे,मुलगा श्रीराम इचके सुनबाई अनुजा,मुली विद्या गोरडे,वैशाली गोरडे इचके कुटुंबातील बहूसंख्य सदस्य,नातेवाईक,मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ईपीएफओचा मोठा निर्णय हाय्यर पेन्शन सुविधा पुन्हा सुरु होणार?

पुणे (दै. संध्या)

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना (EPFO) हाय्यर पेन्शनशी संबधित महत्वाची सुविधा पुन्हा बहाल करणार असून त्यामुळे काही निवडक कर्मचाऱ्यांना त्यांच्या प्रत्यक्ष मूळ वेतन(बेसीक सॅलरी)आणि महागाई भत्ता(DA) यांच्या आधारे अधिक पेन्शन योगदान देण्याचा पर्याय उपलब्ध होणार आहे.EPFO कडून याबाबत लवकरच स्पष्टीकरण जाहीर करण्यात येणार असल्याचे समजते. एक (१)सप्टेंबर २०१४ पूर्वी EPFOअंतर्गत येणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या प्रत्यक्ष मूळ वेतनाच्या आधारे कर्मचारी पेन्शन योजना (EPS) मध्ये योगदान वाढवण्याचा पर्याय




उपलब्ध होता.विशेषत:सार्वजनिक क्षेत्रातील (PSU)कर्मचाऱ्यांना या सुविधेचा लाभ होत होता.मात्र २०१४मध्ये वेतन मर्यादा लागू झाल्यानंतर हा पर्याय बंद करण्यात आला होता.२०१४ मध्ये लागू झालेल्या नियमानुसार ईपीएसओ साठी पेन्शनयोग्य वेतनाची कमाल मर्यादा १५०००रुपये(मूळ वेतन+DA)इतकी निश्चित करण्यात आली होती.सध्याच्या ईपीएफओ च्या नियमानुसार कर्मचारी आणि नियोक्ता दोघेही मूळ वेतन अधिक DA च्या १२टक्के रक्कम ईपीएफ मध्ये जमा करतात तर नियोक्त्याच्या १२टक्के योगदानातून ८.३३ टक्के हिस्सा कर्मचारी पेन्शन योजना (EPS)मध्ये आणि ३.६७टक्के हिस्सा EPF खात्यात जमा होतो. ईपीएस मध्ये कर्मचाऱ्याकडून जमा झालेल्या रकमेतूनच कर्मचाऱ्याला निवृत्तीनंतर मासिक पेन्शन मिळते. ही हाय्यर पेन्शन सुविधा सर्व कर्मचाऱ्यांना लागू नाही. ही सुविधा केवळ त्या कर्मचाऱ्यांना मिळणार आहे.ज्यांनी १सप्टेंबर २०१४पूर्वी हाय्यर पेन्शनचा पर्याय निवडलेला होता.आणि जे त्या वेळी ईपीएस अंतर्गत जास्त वेतनावर योगदान देत होते.त्यांनाच उच्च श्रेणीतील पेन्शन योजनेचा लाभ मिळणार आहे. ही कोणतीही नवीन योजना नसून पूर्वी अस्तित्वात असलेल्या तरतूदीची केवळ पुर्नबहाली आहे. सन २०१४पासून सुरु असलेल्या वेतन मर्यादितील गोंधळ दूर करण्याच्या दृष्टीने ईपीएफओ चे एक महत्वाचे पाऊल मानले जात आहे.

हाय्यर पेन्शन सुविधेचा लाभ ही निवडक कर्मचाऱ्यासाठी दिलासादायक आहे.दिर्घकाळ सुरु असलेल्या हाय्यर पेन्शनविषयक संभ्रमावर तोडगा काढण्याच्या दिशेने ईपीएफओ चा हा निर्णय महत्वाचा मानला जात आहे. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या उच्च पेन्शन योजनेसाठी सन २०२३ मध्ये पेन्शनधारकांनी ईपीएफओ कार्यालयात जाऊन सादर केलेले ONLINE संयुक्त दावा अर्ज ग्राह्य धरावे अथवा ईपीएफओ कडून नव्याने अधिकृत यूएएन पोर्टल उपलब्ध करुन द्यावे अशी विंनती बहुसंख्य पेन्शनधारकांनी पंतप्रधान. केंद्रीय कामगार रोजगार मंत्री.व संसदेतील खासदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केलेली होती.

उच्चतम पेन्शन योजना ही पेन्शनधारकांसाठी महत्वाची सामाजिक सुरक्षा योजना असून ती दैनदिन जीवनाशी आणि आरोग्याशी निगडीत असल्याने त्याबाबत सहानभूतिपूर्वक निर्णय घेण्यात अशी मागणी निवेदनात करण्यात आलेली होती असे पेन्शनधारकांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### विश्वेश्वर एम्पॉवरमेंट ऑर्गनायझेशनतर्फे बसव उद्योजक पुरस्कारांचे वितरण

पुणे (दैनिक संध्या) : लिंगायत समाजातील उद्योजकांची संघटना असलेल्या विश्वेश्वर एम्पॉवरमेंट ऑर्गनायझेशन, इंडियाच्या वतीने दहा समाजबांधवांना 'बसव उद्योजक पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. या संघटनेचे अध्यक्ष अनिल मंद्रुपकर यांच्या नेतृत्वाखाली नुकतेच या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले होते. अक्कलकोट येथील लायन्स इंटरनॅशनलचे माजी प्रांतपाल राजशेखर कापसे यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण झाले. प्रसंगी संघटनेचे महासचिव गणेश बिराजदार, सचिव अमित पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रमात नवी दिल्ली येथे प्रतिष्ठित अटलसेवा पुरस्कार व फ्रान्स येथील थीम इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीकडून 'डॉक्टरेट' पदवी मिळाल्याबद्दल अनिल मंद्रुपकर यांचा समाजाच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. विश्वेश्वर बँकेचे उपाध्यक्ष राज मिरजे, आनंद बेल्हाड, ऋषिकेश शेरीकर, गणेश माळी, सीए हनुमंतराव चौधरी, प्रियांका गुळवे, राहुल जिगजिन्नी, समीर साखरे विजय लिंगायत यांना 'बसव उद्योजक पुरस्कार' प्रदान करण्यात आला. तसेच अक्कलकोट येथील समर्थ हरवळकर आणि कळंब येथील अंजली साखरे या दोन अभियंत्यांना उत्कृष्ट कार्याबद्दल गौरविण्यात आले. पुरस्काराचे हे दुसरे वर्षे होते. विकसित भारत मिशनअंतर्गत गेल्या दोन वर्षांपासून विश्वेश्वर एम्पॉवरमेंट ऑर्गनायझेशन युवकांमध्ये उद्यमशीलता रुजावी, तसेच त्यांच्या कौशल्य व व्यक्तिमत्व विकासाठी कार्यरत असल्याचे अनिल मंद्रुपकर यांनी नमूद केले. सर्व पुरस्कारार्थींचे अभिनंदन करून राजशेखर कापसे यांनी तरुणांनी उद्योगांकडे वळावे, असे आवाहन केले. नरेंद्र सोलापूर यांनी सूत्रसंचालन केले. प्रशांत उमरदंड यांनी आभार मानले.




### महाराष्ट्र हा भारतीयांच्या स्वाभिमानाचा विषय: छत्रपती वृषाली राजे भोसले

पुणे (दैनिक संध्या) : महाराष्ट्र हा केवळ एक भूप्रदेश नाही तर छत्रपती शिवाजी महाराजांचे कर्तृत्व, छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान आणि स्वराज्य स्थापनेत योगदान दिलेल्या अनेक मावळ्यांच्या त्यागाचे प्रतीक म्हणून तो भारताच्या स्वाभिमानाचा विषय आहे. मराठा साम्राज्य ही देशाच्या इतिहासातील प्रेरणादायी बाब आहे. त्यामुळे मराठा साम्राज्याचा नकाशा एनसीईआरटीच्या पुस्तकांमध्ये पुन्हा समाविष्ट झालाच पाहिजे, अशी आग्रही मागणी सातारा गादीच्या प्रतिनिधी छत्रपती वृषाली राजे भोसले यांनी केली. एनसीईआरटीने हिंदी आणि इंग्रजी माध्यमांच्या पुस्तकातून मराठा साम्राज्याचा नकाशा काढून टाकला आहे. याबाबत राज्यभरात तीव्र प्रतिक्रिया उमटली. खुद्द राज्य सरकारने पत्र देऊन देखील एनसीईआरटीने अद्याप त्याची दखल घेतलेली नाही. या बाबीच्या निषेधार्थ छत्रपती वृषाली राजे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली या महाराष्ट्र धर्म मोर्चाचे आयोजन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ यांच्या वास्तव्याने पावन झालेल्या लाल महालापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत हा मोर्चा काढण्यात आला. एनसीईआरटीकडून पाठ्यपुस्तकातील मराठा साम्राज्याचा नकाशा हटवून दैदीप्यमान इतिहासाला लपवण्याचा आणि खोटा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत घेऊन जाण्याचा प्रयत्न केला जात आहे. छत्रपती घराण्यासह संपूर्ण महाराष्ट्राकडून आपण त्याचा निषेध करीत आहोत, असे छत्रपती वृषाली राजे यांनी यावेळी नमूद केले. तसेच महाराष्ट्र सरकारने याबाबतीत केंद्राकडे पाठपुरावा करावा, असे आवाहन करतानाच त्यांनी मराठा साम्राज्याच्या नकाशाची पाठ्यपुस्तकात पुनर्स्थापना होईपर्यंत हा संघर्ष सुरूच राहील, असा इशाराही दिला. या मोर्चात इतिहास संशोधक, अभ्यासक यांच्यासह विविध संघटना, संस्थाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खुनाचा प्रयत्न करणाऱ्या चौघांना पोलिसांनी केली अटक

**लोणी काळभोर (दै. संध्या)**



कदमवाकवस्ती (ता. हवेली) येथील सागर रेस्टॉरंट अँड बार मध्ये जिवे ठार मारण्याची धमकी देत एका तरुणाच्या डोक्यात बिअरच्या बाटल्या फोडून खुनाचा प्रयत्न करुन फरार झालेल्या एका विधीसंघर्ष बालकासह चार आरोपींना पोलिसांनी मोठ्या शिताफीने अटक केली आहे. त्यांना न्यायालयात हजर केले असता तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

ही घटना शनिवार (१६ मे) रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास घडली होती. यामध्ये प्रसाद दिलीप शेंडगे (वय ३०, रा. कवडीपाट टोलनाका, कदमवाकवस्ती, ता. हवेली, जि. पुणे) हे गंभीर जखमी झाले होते. त्यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून राज राजेंद्र पवार, सौरभ सुनील गायकवाड आणि राहुल संतोष घाडगे (सर्व रा. कवडीपाट टोलनाका, कदमवाकवस्ती, ता. हवेली, जि. पुणे) यांना अटक करण्यात आली आहे. तर १७ वर्षीय विधीसंघर्ष बालकास ताब्यात घेण्यात आले आहे. त्याला बाल न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने १४ दिवसांसाठी बालसुधारगृहात पाठवले आहे.


पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रसाद शेंडगे हे कवडीपाट परिसरातील सागर बार अँड रेस्टॉरंटमध्ये जेवण करत होते. त्यावेळी त्यांच्या मागील टेबलावर चौघेजण बसले होते. काही कारण नसताना अचानक त्यांनी " तु आमच्याकडे का पाहतोस? आम्ही येथील भाई आहोत," असे म्हणत शेंडगे यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर चौघांनी मिळून त्यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. यानंतर शेजारील टेबलवरील बिअरच्या बाटल्या उचलून शेंडगे यांच्या डोक्यावर, छातीवर, नाकावर, कानावर आणि गळ्यावर वार करत त्यांना गंभीर जखमी केले. एवढ्यावरच न थांबता दगड फेकून मारत "तुझा मर्डर करून टाकतो," अशी धमकीही दिली. तसेच बाहेर उभ्या असलेल्या तुकाराम राजेंद्र कांबळे (रा. लडकत रोड, शिवनगर, मुंढवा, पुणे) यांनाही मारहाण करण्यात आली आहे.

गंभीर जखमी शेंडगे यांच्यावर लोणी काळभोर येथील विश्वराज हॉस्पिटलमध्ये अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. त्यांच्या फिर्यादीवरून लोणी काळभोर पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल होताच आरोपी फरार झाले होते. त्यांचा शोध घेण्यासाठी लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी विशेष पथके तयार केली होती. तांत्रिक माहितीच्या आधारे पोलिसांनी सुरुवातीला राहुल संतोष घाडगे याला धिंडोरी (जि. नाशिक) येथून, तर राज पवार याला शिरूर येथून बुधवार (२० मे) रोजी मोठ्या शिताफीने अटक केली. तर गुरुवारी (२१ मे) रोजी सौरभ सुनील गायकवाड आणि १७ वर्षीय विधीसंघर्ष बालकास लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून ताब्यात घेण्यात आले. आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने तिघांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. ही उल्लेखनीय कामगिरी लोणी काळभोरच्या सहाय्यक पोलीस आयुक्त अनुराधा उदमले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दिगंबर सोनटक्के, पोलीस उपनिरीक्षक रुपाली जाधव, पोलीस हवालदार अण्णा माने, रामहरी वणवे, सागर जगदाळे, निलेश कोल्हे, सुरज कुंभार, पोलीस अंमलदार सचिन सोनवणे, राहुल कर्डिले, प्रवीण धाडस, अशोक गिरी, खरात, सागर धायतोंडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली आहे.

## 'प्रायॉरिटी पोस्टपेड' सेवा सुरू

**पुणे (दै. संध्या)**

गर्दीच्या ठिकाणी व्हिडिओ कॉल, फोटो अपलोड किंवा ई-मेल डाउनलोड करताना ग्राहकांना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी भारती एअरटेलने 'एअरटेल प्रायॉरिटी पोस्टपेड' या नव्या सेवेचा शुभारंभ केला आहे. कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी शशवंत शर्मा यांनी ही माहिती दिली. शाश्वत शर्मा म्हणाले, "गर्दीच्या ठिकाणी नेटवर्कचा अनुभव सातत्यपूर्ण राहावा यासाठी आम्ही विशेष प्रयत्न केले आहेत. ग्राहकांना व्हिडिओ कॉल, ई-मेल डाउनलोड किंवा फोटो अपलोड करताना येणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आम्ही 'एअरटेल प्रायॉरिटी पोस्टपेड' सेवा सुरू केली आहे." ही सेवा कंपनीच्या 5G नेटवर्कमधील 'स्लायसिंग' या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित आहे. या तंत्रज्ञानामुळे नेटवर्कमध्ये सुधारणा होऊन पोस्टपेड ग्राहकांना अधिक स्थिर आणि अखंड



कनेक्टिव्हिटीचा अनुभव मिळणार आहे. पाश्चिमात्य देशांमध्ये वापरल्या जाणाऱ्या या तंत्रज्ञानाचा भारतात वापर सुरू होत असल्याचा आनंदही त्यांनी व्यक्त केला. कंपनीनुसार, 'एअरटेल प्रायॉरिटी पोस्टपेड' सुविधा सर्व पोस्टपेड प्लॅन्ससाठी उपलब्ध करण्यात आली आहे. सध्या पोस्टपेड वापरणाऱ्या ग्राहकांना हा लाभ आपोआप मिळणार आहे. तर प्रीपेड ग्राहकांना एअरटेल ॲप किंवा जवळच्या एअरटेल स्टोअरमार्फत पोस्टपेडमध्ये अपग्रेड करता येणार आहे.

## इंडियन ऑईलकडून इंधनपुरवठा सुरळीत

**मुंबई (दै. संध्या)**

**महाराष्ट्रात डिझेल मागणीत २७.९ टक्क्यांची वाढ**

देशातील विविध भागांमध्ये इंधनाच्या मागणीत वाढ होत असतानाही इंडियन ऑईलकडून पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत सुरू असल्याची माहिती देण्यात आली आहे. वाढती मागणी लक्षात घेता कंपनीने वाहतूक व वितरण व्यवस्था अधिक सक्षम करून अखंड सेवा कायम ठेवली आहे.

१ मे ते २१ मे २०२६ या कालावधीत महाराष्ट्रातील डिझेल विक्रीत मोठी वाढ नोंदविण्यात आली आहे. राज्यात एकूण विक्री २ लाख ६२ हजार २३५ किलोलीटरवर पोहोचली असून मागील वर्षाच्या तुलनेत त्यात २७.९ टक्के वाढ झाली आहे.



नांदेडमध्ये सर्वाधिक ७२.४ टक्के वाढ नोंदली गेली असून परभणीमध्ये ५६.४ टक्के, हिंगोली आणि धाराशिवमध्ये प्रत्येकी ५५.१ टक्के वाढ झाली आहे. सांगलीमध्ये ४९.३ टक्के, यवतमाळमध्ये ४२.७ टक्के, बुलढाण्यात ४२.८ टक्के आणि सोलापुरात ४०.१ टक्के वाढ झाली आहे. पुण्यातही डिझेल विक्रीत १४.७ टक्के वाढ झाली आहे.

ग्रामीण भागातील मशागत व कापणीची कामे, सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांकडील तुलनेने कमी दर आणि व्यावसायिक ग्राहकांचा वाढता कल यामुळे मागणीत वाढ झाल्याचे सांगण्यात आले आहे. अनेक संस्थात्मक ग्राहकांनीही इंधन पंपांमधून थेट खरेदी सुरू केल्याने अतिरिक्त मागणी निर्माण झाली आहे.

देशभरातील साठवण केंद्रे, वितरण केंद्रे, वाहिन्या, घरगुती गॅस भरणी केंद्रे आणि इंधन पंपांच्या माध्यमातून पुरवठा अखंड सुरू असल्याचे स्पष्ट करण्यात आले. वाहतूक व्यवस्था आणि निवडक इंधन पंप चोवीस तास सुरू ठेवण्यात आले असून राज्य प्रशासनाशी समन्वय साधून पुरवठा व्यवस्था सक्षम करण्यात आली आहे.

देशभरात पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याने नागरिकांनी घाबरून अतिरिक्त खरेदी करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. इंधन उपलब्धतेबाबतची माहिती केवळ अधिकृत माध्यमांवरूनच घ्यावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

### सोमैया विद्याविहार विद्यापीठाने विविध शाखांतील पदवी व पदव्युत्तर

## अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रियेस केला प्रारंभ

**पुणे (दै. संध्या)**




सोमैया विद्याविहार विद्यापीठाने (एसव्हीयू) शैक्षणिक वर्ष २०२६ साठी पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेचा प्रारंभ झाल्याची घोषणा केली आहे. विद्यापीठाने कला, वाणिज्य आणि विज्ञान या तिन्ही शाखांतील विद्यार्थ्यांकडून प्रवेशासाठी अर्ज मागविले आहेत. 'सोमैया विद्याविहार विद्यापीठ प्रवेश परीक्षा'(एसव्हीयूईटी) ही दिनांक ६ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहे.

एसव्हीयूईटी ही विविध पदवीपूर्व अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशासाठीची एक महत्त्वाची अशी प्रवेश परीक्षा आहे. ही परीक्षा 'इंटरनेट-प्रॉक्टर्ड'(इंटरनेट-आधारित देखरेखीखाली) या पद्धतीने घेतली जाते. त्यामुळे उमेदवारांना घरातूनच परीक्षा देणे सुलभ होते. तसेच या प्रवेश परीक्षेद्वारे विद्यार्थी त्यांच्या शैक्षणिक आवडीनिवडी आणि करिअरविषयक आकांक्षांनुसार वाणिज्य व व्यवसाय अभ्यासक्रम, संगणक क्षेत्र, डेटा सायन्स, मानव्यशास्त्र व समाजशास्त्र, लिबरल आर्ट्स, डिझाइन, कला सादरीकरण (परफॉर्मिंग आर्ट्स) तसेच इतर विविध क्षेत्रांतील अभ्यासक्रमांसाठी अर्ज करू शकतात. एसव्हीयूचा शैक्षणिक दृष्टिकोन लवचिकता आणि उद्योगसुसंगतता लक्षात घेऊन तयार करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांसाठी वीसहून अधिक बहुविद्याशाखीय मायनर्स उपलब्ध असून, त्यामुळे त्यांना त्यांच्या मूळ विषयाबरोबरच विविध क्षेत्रांचाही अभ्यास करता येतो. थेट प्रकल्प, इंटर्नशिप तसेच समुदायाधारित उपक्रमांद्वारे दिल्या जाणाऱ्या अनुभवाधारित शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानाबरोबरच व्यावहारिक अनुभवही प्राप्त होतो. विद्यापीठ विद्यार्थ्यांना जागतिक अनुभवाच्या संधीही उपलब्ध करून देते. यामध्ये अमेरिका, युनायटेड किंग्डम, युरोप तसेच इतर प्रदेशांतील भागीदार विद्यापीठांसोबत आयोजित परदेशी सत्र कार्यक्रमांचा समावेश आहे. हे कार्यक्रम अनेकदा अतिरिक्त शिक्षण शुल्काशिवाय राबवले जातात. या आंतरराष्ट्रीय एकात्मतेमुळे विद्यार्थ्यांना जागतिक दृष्टिकोनासह आंतर-सांस्कृतिक क्षमता विकसित करण्याची संधी मिळते.

## मंचर शहराला वादळी पावसाचा तडाखा; तासाभरात ३६ मिमी पाऊस

**मंचर (दै. संध्या)**

आंबेगाव तालुक्यातील मंचर शहर व परिसरात शुक्रवारी सायंकाळी झालेल्या जोरदार वादळी पावसाने जनजीवन विस्कळीत झाले. अवघ्या एका तासात ३६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून रस्त्यांवरून पुरासारखे पाणी वाहू लागले. अनेक ठिकाणी फलक कोसळले, तर पावसाचे पाणी दुकानांमध्ये शिरल्याने व्यापाऱ्यांचे नुकसान झाले. मंचर बस स्थानकासमोरील मुख्य मार्गावर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागला. परिसरातील अनेक दुकानांत पाणी शिरल्याची माहिती मंचर नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष लक्ष्मण थोरात व स्थानिक व्यावसायिकांनी दिली. दरम्यान, पिंपळगाव खडकी, अवसरी खुर्द, गावडेवाडी, एकलहरे, सुलतानपूर, श्रीक्षेत्र वडगाव काशिंबे, चांडोली खुर्द आणि लांडेवाडी परिसरातही जोरदार पावसाने हजेरी लावली. वादळी वाऱ्यामुळे अनेक घरांचे पत्रे उडून गेल्याने काही कुटुंबांचे संसार अक्षरशः उघड्यावर आले. शेती क्षेत्रालाही या पावसाचा मोठा फटका बसला आहे. टोमॅटो, फ्लॉवर, कोबी, मिरची आदी पिकांसाठी तयार करण्यात आलेली रोपे पाण्याबरोबर वाहून गेली. तसेच बाजरी व कांदा पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती शेतकरी सचिन बांगर यांनी दिली.

# २४ मे रोजी 'दे दे प्यार दे २'चा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमिअर

**मुंबई (दै. संध्या)**




हास्य, प्रेम आणि कौटुंबिक मनोरंजनाचा धमाल प्रवास अनुभवायला सज्ज व्हा! 'दे दे प्यार दे 2'चा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमिअर ह्या रविवारी, 24 मे रोजी दुपारी 12 वाजता झी सिनेमावर होणार आहे. विनोद आणि नाट्याचा आणखी मसाला घेऊन आलेल्या या सीक्वेलमध्ये, आई-वडिलांची संमती मिळवण्यासाठी नायक-नायिकांनी केलेला हलकाफुलका आणि मजेशीर प्रयत्न दाखवण्यात आला आहे. प्रेम आणि कुटुंब यांच्या अपेक्षा जुळवताना अनेक विनोदी आणि अनपेक्षित प्रसंग घडत जातात. कॉमेडी, रोमांस आणि कौटुंबिक भावनांचा सुरेख मेळ असलेला हा चित्रपट घरबसल्या संपूर्ण कुटुंबासह पाहण्याची ही एक उत्तम आणि न चुकवण्यासारखी संधी आहे.

'दे दे प्यार दे 2' या चित्रपटाचे दिग्दर्शन अंशुल शर्मा यांनी केले असून निर्मिती टी-सीरिजचे भूषण कुमार व कृष्ण कुमार तसेच लव्ह फिल्म्सचे लव्ह रंजन आणि अंकुर गर्ग यांनी केले आहे. या चित्रपटात अजय देवगण, रकुल प्रीत सिंग, आर. माधवन, मीझान जाफरी, जावेद जाफरी, ईशिता दत्ता आणि गौतमी कपूर अशी दमदार स्टारकास्ट पाहायला मिळते. या सीक्वेलमध्ये मूळ चित्रपटाची मजा कायम ठेवत ताज्या दमाचे पैलू, नवीन संघर्ष आणि भरपूर विनोदी प्रसंगांची भर घालण्यात आली आहे आणि त्यामुळे हा चित्रपट अधिक रोचक आणि मनोरंजक ठरतो.

अजय देवगण यांनी कॉमेडी क्षेत्रात स्वतःची अशी वेगळी ओळख निर्माण केली आहे. सहज टायमिंग आणि मोजक्या हावभावातून विनोद सादर करण्याच्या त्यांच्या खास शैलीमुळे ते नेहमीच प्रेक्षकांना त्यांच्या खुर्च्यांना खिळवून ठेवतात. वर्षानुवर्षे त्यांनी या प्रकारात आपली बहुमुखी प्रतिभा सिद्ध केली आहे. 'दे दे प्यार दे 2'मधूनही त्यांची हीच परंपरा पुढे चालू राहत असून त्यांच्या कॉमेडी प्रवासात आणखी एक मनोरंजक आणि लक्षात राहण्यासारखा टप्पा जोडला गेला आहे.

चित्रपटाबद्दल बोलताना अजय देवगण म्हणाले, "दे दे प्यार दे 2'मध्ये भावना, नाती, गोंधळ आणि अनपेक्षित प्रसंग यांचा मनोरंजक संगम आहे. हा असा चित्रपट आहे की जो तुम्ही निवांतपणे आपल्या कुटुंबासोबत बसून त्याचा आनंद घेऊ शकता. आता झी सिनेमा वर होणाऱ्या वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमिअरद्वारेही प्रेक्षकांना हा चित्रपट एकत्र पाहायला मिळेल याबद्दल मी उत्सुक आहे."

चित्रपटातील आपल्या भूमिकेबद्दल बोलताना आर. माधवन म्हणाले, "या चित्रपटात मी साकारलेली वडिलांची व्यक्तिरेखा ही आपल्या मुलीला खूपच सांभाळणाऱ्या व्यक्तीची आहे, विशेषतः तिचे नाते त्याला अनेक प्रकारे आश्चर्यचकित करते. ही भूमिका साकारताना मला सर्वांत जास्त मजा आली कारण ही व्यक्तिरेखा एकाच वेळी भावनिक, नाट्यमय आणि नकळतपणे विनोदीही आहे. पात्रांमधील केमिस्ट्री आणि संघर्षच कथेला पुढे नेतात आणि प्रेक्षकांनी हा चित्रपट झी सिनेमावर पाहावा यासाठी मी उत्सुक आहे."

आपल्या भूमिकेबद्दल रकुल प्रीत सिंग उत्साहात म्हणाली, "माझी व्यक्तिरेखा दोन पुरुषांमध्ये अडकलेली आहे, जे दोघेही तिच्यासाठी काय योग्य आहे हे ठामपणे मानतात आणि तिथूनच सगळा गोंधळ सुरू होतो. एक तिच्यावर प्रेम करणारा आहे, तर दुसरे तिचे वडील आहेत आणि दोघेही माघार घ्यायला तयार नाहीत. या चित्रपटात मला सर्वांत जास्त आवडलेली गोष्ट म्हणजे भरपूर कॉमेडी असतानाही त्यामागे नात्यांमधील भावना, लोकांचा दृष्टिकोन आणि कुटुंबाची मान्यता यांसारखा अतिशय जवळचा विषयही आहे. हा चित्रपट थोडासा गोंधळलेला, खळखळून हसवणारा आणि कुटुंबांना सहज जोडून घेणाऱ्या प्रसंगांनी भरलेला आहे, जो प्रेक्षकांना झी सिनेमावर पाहायला नक्कीच आवडेल."

मीझान जाफरी म्हणाला, ""दे दे प्यार दे 2' इतका मनोरंजक बनवणारी गोष्ट म्हणजे त्यातील संपूर्ण नाट्य, जे चित्रपटाला एक वेगळी ऊर्जा देते. अजय देवगण सर आणि आर. माधवन सरांसारख्या कलाकारांसोबत विनोदी आणि संघर्षपूर्ण प्रसंगांमध्ये काम करताना मला खूप काही शिकायला मिळाले. पण माझ्या वडिलांसोबत स्क्रीन शेअर करण्याचा अनुभव अधिकच खास होता. कुटुंबासोबत काम करताना एक वेगळीच सहजता आणि मजा आपोआप येते. प्रेक्षकांना आम्हांला एकत्र स्क्रीनवर नाचताना पाहायला विशेष आनंद मिळेल. झी सिनेमावर हा चित्रपट पाहताना प्रेक्षकांना हसवणारी एक धमाल सफर नक्कीच अनुभवायला मिळेल." चित्रपटाबद्दल बोलताना जावेद जाफरी म्हणाले, "अजयसोबत पुन्हा काम करण्याचा अनुभव खूप छान होता. पहिल्या चित्रपटात जे सुरू झाले होते, ते आता अधिक विकसित झाले असून 'दे दे प्यार दे 2'ने विनोद, मनोरंजन आणि भावना यांना पूर्णपणे नव्या उंचीवर नेले आहे. शूटिंगदरम्यान सेटवरची ऊर्जा अफलातून होती आणि अजयसोबत काम करताना एक वेगळीच सहजता आणि आकर्षण जाणवते, जे पडद्यावरही दिसून येते. हा चित्रपट अधिक मोठा, मजेशीर आणि मनोरंजक वाटतो. मीझानसोबत काम करणे हे खास होते. फक्त वडील-मुलगा म्हणून नाही, तर आम्ही दोघेही एकत्र काम करताना खूप आनंदात होतो. त्याच्यासोबत नाचणे हा नक्कीच एक खास अनुभव होता, ज्यात माझी जुनी शैली आणि त्याची नव्या पिढीची ऊर्जा यांचा सुंदर मिलाफ पाहायला मिळतो." दिग्दर्शक अंशुल शर्मा म्हणाले, "दे दे प्यार दे 2'मध्ये आम्हांला प्रेमाच्या नात्यांमध्ये कुटुंब, मतभेद आणि पिढ्यांतील अंतर येताच काय बदल होतात याचा शोध घ्यायचा होता. हा चित्रपट फक्त वयातील फरक असलेल्या नात्यांबद्दल नाही तर त्या परिस्थितीत प्रत्येक पात्र आपल्या मनातील असुरक्षितता, जपणूक आणि भावनिक ओझे कसे घेऊन येते हेही दाखवतो. अजय सर आणि माधवन सर यांच्या व्यक्तिरेखा सतत एकमेकांना आव्हान देतात आणि त्यातूनच विनोद आणि भावनिक गती निर्माण होते. चित्रपटाचे खास वैशिष्ट्य म्हणजे संघर्षाच्या प्रसंगातही पात्रे खूप खरी आणि आपली वाटतात. प्रेक्षकांनी 24 मे रोजी दुपारी 12 वाजता झी सिनेमावर होणाऱ्या वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमिअरमध्ये हा सगळा ड्रामा, कॉमेडी आणि भावना अनुभवाव्यात यासाठी आम्ही उत्सुक आहोत."

'दे दे प्यार दे 2'मध्ये अजय देवगणने साकारलेला एनआरआय आशिष मेहरा त्याच्या पन्नाशीमध्ये आहे आणि त्याची प्रेयसी आयेशा (रकुल प्रीत सिंग) त्याच्यापेक्षा वयाने लहान आहे. तिच्या आई-वडिलांचे मन जिंकण्यासाठी तो भारतात येतो. पण तिच्या कुटुंबाला या दोघांमधील वयातील मोठा फरक समजताच धक्का बसतो आणि ते या नात्याला विरोध करण्याचा ठाम निर्णय घेतात. त्यामुळे होणारे संघर्ष, गैरसमज आणि गोंधळ यामुळे परिस्थिती अधिकच गुंतागुंतीची होते. या सगळ्या भावनिक घडामोडींमध्ये आशिषला त्याच्या प्रेमाची खरी किंमत सिद्ध करावी लागते. मात्र, अचानक आलेल्या एका अनपेक्षित वळणामुळे त्याचे आयेशासोबतचे भविष्य धोक्यात येते. पुढे काय होते हे जाणून घेण्यासाठी हा चित्रपट नक्की पहा. या रविवारी, 24 मे रोजी दुपारी 12 वाजता फक्त झी सिनेमा वर 'दे दे प्यार दे 2'चा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमिअर पाहायला विसरू नका, गोंधळ आणि अफाट मजेने भरलेला हा विनोदी कौटुंबिक चित्रपट तुमचे नक्कीच भरपूर मनोरंजन करेल!



सासवड (ता. पुरंदर) : 'पुरंदर कृषी एक्स्पो २०२६'च्या उद्घाटनप्रसंगी पुरूषोत्तम जगताप, आनंदीकाकी जगताप, संजय जगताप, राजवर्धिनी जगताप व मान्यवर

# सासवडमध्ये 'पुरंदर कृषी एक्स्पो २०२६'चे दिमाखात उद्घाटन




## ■ शेतकऱ्यांच्या प्रतिसादाने मैदान फुलले; विविध तंत्रज्ञान व बक्षिसांची लयलूट ■



### प्रदर्शनामागील मुख्य हेतू

"शेतकऱ्यांना आधुनिक शेतीची दिशा व नवीन तंत्रज्ञानाची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणे, हाच या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश आहे. पुरंदरसह जिल्हयातील शेतकऱ्यांनी या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा सामुहिकपणे एकत्र येत आपली शेती अधिक प्रगत करावी."

**- संजय जगताप, माजी आमदार तथा आयोजक**

### शेतकऱ्यांच्या प्रगतीला नवी दिशा

"बदलत्या हवामानात टिकून राहण्यासाठी अशा कृषी प्रदर्शनांची अत्यंत गरज आहे. या एक्स्पोमुळे शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञान आणि प्रक्रिया उद्योगांची माहिती मिळेल, ज्याचा थेट फायदा त्यांच्या उत्पादनात आणि आर्थिक प्रगतीत होईल. या उपक्रमाला शुभेच्छा."

**- पुरूषोत्तम जगताप, अध्यक्ष, सोमेश्वर साखर कारखाना**

01 — २२ ते २५ मे दरम्यान चार दिवसीय कृषी महोत्सव

02 — १६० व्यावसायिक स्टॉल्स आणि ५० महिला बचत गटांचे स्टॉल्स

03 — एआय आधारित शेती व ड्रोन फवारणीची थेट प्रात्यक्षिके

04 — आधुनिक सिंचन व पशुपालन तंत्रज्ञानाची माहिती

05 — दररोज १०० कृषी अवजारांचे लकीड्रॉ बक्षीस

06 — शेवटच्या दिवशी ट्रॅक्टरचे बंपर बक्षीस

07 — शेतकऱ्यांसाठी मोफत बेसन-भाकरीची व्यवस्था

08 — पार्किंग, सुरक्षा आणि विशेष मार्गदर्शन सुविधा

09 — उत्कृष्ट शेतकरी व महिला बचत गटांचा सन्मान

10 — पहिल्याच दिवशी शेतकरी व नागरिकांची मोठी गर्दी






**सासवड (दै. संध्या) :** सहकारमहर्षी स्व. चंदूकाका जगताप यांनी स्थापन केलेल्या शरद कृषी व पर्यावरण विकास प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित 'पुरंदर कृषी एक्स्पो २०२६' सासवड (ता.पुरंदर) येथील शरद कृषी व पर्यावरण विकास प्रतिष्ठानच्या वतीने शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूलच्या मैदानावर आयोजित भव्य 'पुरंदर कृषी एक्स्पो २०२६' चे शुक्रवारी सोमेश्वर साखर कारखान्याचे अध्यक्ष पुरूषोत्तम जगताप यांच्या अध्यक्षतेखाली आणि सासवडच्या नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांच्या हस्ते आयोजक माजी आमदार संजय जगताप आणि ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप यांच्या उपस्थितीत शानदार उद्घाटन झाले. २२ ते २५ मे दरम्यान चालणाऱ्या या प्रदर्शनात पहिल्याच दिवशी शेतकरी आणि नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद पाहायला मिळाला.

माजी आमदार संजय जगताप यांनी प्रदर्शनामागील भूमिका स्पष्ट केली. कात्रज डेअरीचे उपाध्यक्ष तानाजी जगताप, संत सोपानकाका सहकारी बँकेचे अध्यक्ष रमणिकलाल कोठडिया, भाजपाचे नेते बाबाराजे जाधवराव यांनीही आपल्या मनोगतातून या उपक्रमाचे कौतुक करत प्रदर्शनास शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी पुण्याचे नगरसेवक संदीप बेलदरे, जिल्हा परिषद सदस्य हरीभाऊ लोळे, प्राजक्ता दुर्गाडे, अजय इंगळे, पंचायत समिती सदस्य माऊली यादव, सायली शिंदे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर वढणे, निरा बाजार समितीचे सभापती संदीप फडतरे, नंदकुमार जगताप, उपसभापती बाळासाहेब शिंदे, सोमेश्वरचे उपाध्यक्ष मिलींद कांबळे, संचालक बाळासाहेब कामथे, आनंता तांबे, तुषार माहूरकर, रणजित मोरे, लालासो नलावडे, महादेव टिळेकर, देविदास कामथे, मनिषा नाझीरकर, शाहजहान शेख, विक्रम दगडे, बाळासाहेब जगदाळे, गणेश होले, सासवडचे उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, नगरसेवक अजित जगताप, राजन जगताप, ज्ञानेश्वर जगताप, प्रदीप राऊत, ज्ञानेश्वर गिरमे, लिना वढणे, शितल भोंडे, प्रियांका जगताप, प्रियांका देशमुख, माजी नगराध्यक्ष हेमंत भोंगळे, उपनगराध्यक्ष सुहास लांडगे, यशवंतकाका जगताप, संजय ग. जगताप, संजय चव्हाण, भाजपाचे संभाजी काळाणे, संजय निगडे, संदीप कटके, साकेत जगताप, सुनील देशपांडे, सचिन पेशवे, पंचायत समितीचे माजी सभापती रमेश मोकाशी, एकनाथ यादव, सुनिता कोलते, विठ्ठल मोकाशी, शांताराम कापरे, पुरंदर नागरीचे उपाध्यक्ष कृष्णा शेट्टी, आनंदराव घोरपडे, चंद्रकांत बोरकर, ॲड किशोर म्हस्के पाटील, शेतकरी संघटनेचे अध्यक्ष दिलीप गिरमे यांसह विविध संस्थांचे पदाधिकारी, सरपंच, सदस्य, सोसायट्यांचे चेअरमन, संचालक, शेतकरी, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चार दिवसीय महोत्सवात आधुनिक कृषी तंत्रज्ञान, एआय आधारित शेती, ड्रोन फवारणीची थेट प्रात्यक्षिके, प्रगत सिंचन व्यवस्था, पशुपालनाची अद्ययावत माहिती दिली जात आहे. प्रदर्शनात एकूण १६० व्यावसायिक स्टॉल्स आणि ५० महिला बचत गटांचे स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. मैदान परिसरात पार्किंग, कडक सुरक्षा आणि शेतकऱ्यांसाठी विशेष मार्गदर्शनाच्या सुविधेसह प्रत्येकाला मोफत बेसन भाकरीचा आस्वाद मिळणार आहे.

महोत्सवात दररोज विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन होणार आहेत. तसेच लकीड्रॉच्या माध्यमातून दररोज १०० कृषी अवजारे आणि प्रदर्शनाच्या शेवटच्या दिवशी ट्रॅक्टरचे बंपर बक्षीस दिले जाणार आहे. आयोजक संजय जगताप व राजवर्धिनी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली संयोजक डॉ. एम. एस. जाधव, समरादित्य जगताप, प्रकाश पवार, संभाजी गरुड, विलास जगताप आणि त्यांचे सहकारी नियोजन करीत आहेत. सोमेश्वर कारखाना, कात्रज डेअरी, पीडीसीसी बँक, सोपानकाका बँक, निसान कंपनी यांनी प्रायोजकत्व स्विकारले आहे.

शरद कृषी व पर्यावरण विकास प्रतिष्ठानचे संचालक प्रदीप पोमण यांनी प्रास्ताविक केले. महेश राऊत, रवींद्रपंत जगताप, नंदकुमार सागर, जालिंदर काळे यांनी सुत्रसंचलन केले तर प्रकाश पवार यांनी आभार मानले.

यानिमित्त कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या उत्कृष्ट शेतकरी, गोपालक, महिला बचत गट आणि प्रक्रिया उद्योग यांना कृषीनिष्ठ शेतकरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कृषिनिष्ठ शेतकरी : सदाशिव टिळेकर (ॲव्हाकाडो व ड्रॅगन फ्रुट शेती), राहुल भोसले (फळबाग लागवड, शेडनेट), राणी सचिन काळाणे (फळबाग लागवड, आधुनिक तंत्रज्ञान), राजश्री कैलास शिर्के (नैसर्गिक व गट शेती), गोपाळ कदम (जैविक व सेंद्रिय निविष्ठा डाळींब, अंजीर, सिताफळ वापर), शशिकला मधुकर राऊत (मल्टीलेयरींग फार्मिंग), संतोष म्हस्के (एकरी १०० टन ऊस उत्पादक), स्वप्निल मोरे (उत्कृष्ट अंजीर उत्पादक शेतकरी), वैशाली शंकर कड (पॉलीहाऊस फुलशेती), पुरंदर हायलॅन्ड्स एफ.टी.सी.एल. (अंजीर प्रकिया उद्योग व निर्यात), नितीन इंगळे (आंबा, सिताफळ, पेरू, चिक्कू, स्ट्राबेरी, जांभुळ प्रक्रिया उद्योग), सुवर्णाताई खेनट (जांभूळ ज्युस, कॅन्डी प्रक्रिया उद्योग), उत्कृष्ट गोपालक : समीर रोहिदास यादव (उत्कृष्ट गायी व जातीवंत ब्रीड), साईप्रसाद शेंडकर (गिर, जाफ्राबादी प्रति दिन २० लि. दुध क्षमता).



